
पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 16 । 16 ऑगस्ट , 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.

# समृद्ध भारताचा संकल्प प्रत्यक्षात आणू या





## अध्यक्षीय मनोगत

# समृद्ध भारत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशवासीयांशी संवाद साधला. लाल किल्ल्यावरून मोदीजींचे हे सलग अकरावे भाषण होते. मोदीजींचे हे भाषण २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याच्या त्यांच्या संकल्पाची पुनश्च ग्वाही देणारे होते. लाल किल्ल्यावरील यावेळच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे या सोहळ्यासाठी पंचायत पातळीवरील महिला लोकप्रतिनिधींना तसेच शेतकऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. या आमंत्रित शेतकऱ्यांशी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी संवादही साधला. त्याचबरोबर याच कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी ऑलिंपिकला गेलेल्या भारतीय खेळाडुंशीही संवाद साधला. पॅरिस ऑलिंपिकमध्ये प्रतिनिधित्व केलेला प्रत्येक भारतीय खेळाडू हा चॅम्पियनच आहे, अशा शब्दांत मोदीजींनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले. पंतप्रधान मोदीजींच्या कार्यकाळाचे अनेक वैशिष्ट्यांपैकी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी क्रीडा क्षेत्रासाठी घेतलेले निर्णय. आंतरराष्ट्रीय धावपटू अंजु बॉबी जॉर्ज हिने काही दिवसांपूर्वी आधीच्या मनमोहन सरकार आणि मोदी सरकार यांच्या क्रीडाविषयक दृष्टीतील फरक जाहीरपणे सांगितला होता. पूर्वीच्या सरकारकडून खेळाडूंची दखलच घेतली जात नसे. मात्र नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर खेळाडूंशी नित्य संवाद ठेवला आहे, असे अंजु बॉबी जॉर्ज म्हणाल्या होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१८ मध्ये 'खेलो इंडिया' नावाचा उपक्रम सुरू केला. त्यासाठी सुमारे ४ हजार कोटी एवढ्या रकमेची तरतूदही केली. अन्य क्षेत्रात भारताची विकासाकडे वाटचाल सुरू असताना क्रीडा क्षेत्र मागे राहू नये, हा पंतप्रधान मोदींचा आग्रह आहे. क्षमता असूनही भारतीय खेळाडू क्रिकेटचा अपवाद वगळता आंतरराष्ट्रीय स्तरावर का यशस्वी ठरत नाहीत, यामागची कारणे पंतप्रधान मोदी यांनी विविध क्रीडा प्रकारातील ज्येष्ठ क्रीडापटूंशी खुलेपणाने संवाद साधत जाणून घेतली. देशाचा पंतप्रधान ख्यातनाम खेळाडूंशी स्वत:हून संपर्क साधतो आणि भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर का मागे राहतात, याची कारणे जाणून घेतो, असा अनुभव देशाने प्रथमच घेतला. ज्येष्ठ क्रीडापटूंशी संवाद साधल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी 'खेलो इंडिया' नावाचे अभियान केंद्र सरकारमार्फत सुरू केले. या अभियानात 'खेलो इंडिया युवा स्पर्धा' आणि 'खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा' यांचे आयोजन गेल्या ५ -६ वर्षांपासून केले जात आहे. या अभियानातून गेल्या ६ वर्षात १ हजाराहून अधिक 'खेलो इंडिया केंद्र' जिल्हा पातळीवर सुरू झाली आहेत. वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन, गुणवान खेळाडूंचा शोध घेणे, शालेय खेळाडूंना आवश्यक ते प्रशिक्षण देणे आदी हेतू ठेवून 'खेलो इंडिया' अभियान कार्यरत आहे. मोदीजींनी आपल्या भाषणात विद्यमान नागरी कायद्या ऐवजी ''सेक्युलर सिव्हिल कोड'' ची गरज प्रतिपादन केली. सर्व धर्मियांना समान नागरी कायदा असणे आवश्यक आहे, असे भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यादृष्टीने केंद्र सरकारने आता निर्णायक पाऊल टाकले आहे. सर्व भारतीयांनी निश्चय केला तर २०४७ पर्यंत समृद्ध भारताचा संकल्प प्रत्यक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग



०४ समृद्ध भारताचा संकल्प प्रत्यक्षात आणू या




०९ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये गेलेला प्रत्येक खेळाडू 'चॅम्पियन' : पंतप्रधान नरेंद्र मोदी




१० शेती उत्पादन वाढविण्याला प्राधान्य



११ समर्पित राजकारणाचा आदर्श



१५ ... हा तर गोरगरीब मुस्लिमांच्या विकासाला विरोध



१७ अन्नदाता शेतकरी




संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया, bjpmaha.manogat@gmail.com editor.bjpmanogat@gmail.com येथे पाठवाव्यात.

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०



# समृद्ध भारताचा संकल्प प्रत्यक्षात आणू या

● पंतप्रधान नरेंद्र मोदी

> आज अत्यंत शुभ क्षण आहे, ज्यावेळी आपण देशासाठी बलिदान देणाऱ्या, देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःचे जीवन समर्पित करणाऱ्या, आयुष्यभर त्यासाठी संघर्ष करणाऱ्या, फाशीच्या तख्तावर 'भारतमाता की जय' अशा घोषणा देणाऱ्या, असंख्य स्वातंत्र्य प्रेमींना वंदन करण्याचा हा उत्सव आहे, त्यांचे पुण्यस्मरण करण्याचा हा प्रसंग आहे. स्वातंत्र्य सैनिकांनी आज आपल्याला याप्रसंगी स्वातंत्र्यासह श्वास घेण्याचे भाग्य दिले आहे. हा देश त्यांचा ऋणी आहे. अशा प्रत्येक महान व्यक्तीप्रती आपण श्रद्धेची भावना व्यक्त करूया.

**आज** जे महान लोक देशाच्या संरक्षणासाठी तसेच देशाच्या उभारणीसाठी संपूर्ण तन्मयतेने आणि संपूर्ण कटिबद्धतेसह देशाचे संरक्षणदेखील करत आहेत आणि देशाला नव्या उंचीवर पोहोचवण्याचे प्रयत्न देखील करत आहेत, मग ते आपले शेतकरी असोत, आपल्या तरुणांचा उत्साह असो, आपल्या माता-भगिनींचे योगदान असो, दलित असो, पिडीत असो, शोषित असो किंवा वंचित असोत, आव्हानात्मक परिस्थितीत देखील देशाच्या स्वातंत्र्याप्रती त्यांची निष्ठा, लोकशाहीप्रती त्यांची श्रद्धा, ही संपूर्ण जगासाठी एक प्रेरणादायी घटना आहे. मी आज अशा सगळ्यांनाच आदरपूर्वक नमस्कार करतो.

या वर्षी आणि गेल्या काही वर्षांमध्ये नैसर्गिक संकटांमुळे आपली चिंता वाढत चालली आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे अनेकांनी स्वतःच्या कुटुंबातील माणसे गमावली आहेत, संपत्ती गमावली आहे, देशाने देखील अनेकदा राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान सहन केले आहे. मी आज त्या सर्वांप्रती संवेदना व्यक्त करतो आणि त्यांना हा विश्वास देऊ इच्छितो की संकटांच्यावेळी हा देश तुम्हा सर्वांसोबत आहे. आपण जरा स्वातंत्र्यापूर्वीचे ते दिवस आठवूयात. शेकडो वर्षांची गुलामी, तो कालखंड अत्यंत संघर्षाचा होता. तरुण असो, वयस्कर असो, महिला असो, आदिवासी असो, हे सर्वजण गुलामीविरोधात लढत

राहिले, सतत लढत राहिले. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराची आपण नेहमी आठवण काढतो, त्याच्या आधी देखील आपल्या देशातील असे अनेक आदिवासी प्रदेश असे होते जेथे स्वातंत्र्यासाठी संघर्ष होत होता याचा इतिहास साक्षीदार आहे. गुलामगिरीचा इतका मोठा काळ, जुलमी शासक, अनंत यातना, सामान्यांतील सामान्य माणसांचा विश्वास भंग करण्यासाठी योजलेल्या युक्त्या,अशा स्थितीत देखील त्या वेळच्या लोकसंख्येचा विचार करता, सुमारे ४० कोटी देशवासीयांनी स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात असे साहस दाखवले, असा धाडसीपणा दाखवला, सामर्थ्य दाखवले. त्या सर्वांनी एक स्वप्न उराशी बाळगले, सतत एक निर्धार करुन ते कार्य करत राहिले, झुंजत राहिले. त्यावेळी एकच स्वर होता– वंदे मातरम! एकच स्वप्न होते, भारताच्या स्वातंत्र्याचे. चाळीस कोटी देशवासीयांनी हे कार्य केले. आणि आमच्या धमन्यांमध्ये त्यांचे रक्त खेळते आहे याचा आम्हांला अभिमान आहे. ते आपले पूर्वज होते. केवळ चाळीस कोटी लोकांनी जगातील महासत्तेला उखडून फेकून दिले होते. गुलामीच्या बेड्या तोडून टाकल्या होत्या. ज्यांचे रक्त आपल्या अंगातून वाहते आहे ते आपले पूर्वज जर हे करू शकतात तर आज आपण १४० कोटी आहोत. जर चाळीस कोटी लोक गुलामगिरीच्या बेड्या तोडू शकतात, चाळीस कोटी लोक स्वातंत्र्याचे स्वप्न पूर्ण करू शकतात, स्वातंत्र्य प्राप्त करुनच दाखवतात, तर १४० कोटी लोकांचा हा देश, हे माझे नागरिक, माझे १४० कोटी कुटुंबीय, जर निर्धार करून वाटचाल करू लागले, एक दिशा निश्चित करून त्या दिशेने जाऊ लागले, एकमेकांसोबत पावले टाकत, खांद्याला खांदा भिडवून निघाले, तर आव्हाने कितीही असो, अभावांचे प्रमाण कितीही तीव्र असले तरीही, साधन संपत्तीसाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी प्रत्येक आव्हानाचा सामना करून आपण समृध्द भारत निर्माण करू शकतो. आपण २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करू शकतो. जर ४० कोटी भारतवासी आपल्या पुरुषार्थाने,आपल्या समर्पणाने, आपल्या त्यागाने, आपल्या बलिदानाने, स्वातंत्र्य मिळवू शकतात, स्वतंत्र भारत निर्माण करू शकतात, तर १४० कोटी देशवासीय त्याच भावनेसह समृद्ध भारतदेखील उभारू शकतात.

असा एक काळ होता जेव्हा, लोक देशासाठी मरण पत्करायला तयार होते. आता स्वातंत्र्य मिळाल्यावर आज



देशासाठी जगण्याची शपथ घेण्याची वेळ आली आहे. जर देशासाठी मरण स्वीकारण्याचा निश्चय आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकतो तर, देशासाठी जगण्याचा निर्धार समृद्ध भारत देखील उभारून दाखवू शकतो.

विकसित भारत २०४७ हे केवळ भाषणातील शब्द नव्हेत तर याच्या पाठीमागे, कठोर मेहनत आहे, देशभरातील कोट्यवधी लोकांकडून सूचना मागवल्या जात आहेत, आणि आम्ही, देशवासियांकडून सूचना मागवल्या. आणि मला अत्यंत प्रसन्नता वाटते की, माझ्या देशातील कोट्यवधी नागरिकांनी २०४७ मधील विकसित भारत उभारणीसाठी असंख्य सूचना मांडल्या, प्रत्येक देशवासियाचे स्वप्न त्यांच्यातून प्रतिबिंबित होत आहे, प्रत्येक देशवासियाचा निर्धार त्यातून व्यक्त होत आहे. तरुण असो की प्रौढ, गावातील लोक असो किंवा शहरातील, शेतकरी असो, कामगार असो, दलित असो की आदिवासी, डोंगराळ प्रदेशातील रहिवासी असोत किंवा जंगलातील लोक, शहरातील नागरिक अशा प्रत्येकाने, २०४७ मध्ये देश जेव्हा स्वातंत्र्यप्राप्तीची शतकपूर्ती साजरी करत असेल तोपर्यंत विकसित भारत निर्माण करण्यासाठी अनमोल सूचना केल्या. मी जेव्हा या सगळ्यांनी सुचवलेल्या बाबी बघत होतो तेव्हा माझे मन प्रसन्न होत होते, देशाला जगाची कौशल्यविषयक राजधानी बनवण्याची सूचना आमच्यासमोर मांडण्यात आली होती, २०४७ मध्ये



विकसित भारत निर्माणासाठी काही लोकांनी देशाला निर्मितीचे जागतिक केंद्र बनवण्याच्या सूचना केल्या, काही लोकांनी भारतातील विद्यापीठांना जागतिक स्वरूप देण्याच्या सूचना केल्या. काही लोकांनी हेही विचारले की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इतक्या वर्षांनी आपल्या माध्यमांना जागतिक स्वरूप द्यायला नको का? काही लोक असे म्हणाले की आपल्या देशातील कुशल तरुणांना जगातून प्रथम पसंती मिळाली पाहिजे. काही जणांनी असे सुचवले की भारताने प्रत्येक क्षेत्रात लवकरात लवकर आत्मनिर्भर झाले पाहिजे. काही लोकांनी सुचवले की आपल्या देशातील शेतकरी जे भरड धान्य पिकवतात, ज्याला आपण श्रीअन्न असे म्हणतो ते सुपरफूड आपल्याला जगाच्या प्रत्येक जेवणाच्या टेबलवर पोहोचवायचे आहे. आपल्याला जगाच्या पोषणाला बळ द्यायचे आहे आणि भारतातील लहान शेतकऱ्यांना सक्षम बनवायचे आहे. अनेकांनी असेही सांगितले की, देशातील स्वराज्य संस्थांपासून ते अनेक संस्थांमध्ये प्रशासकीय सुधारणा करण्याची अत्यंत गरज आहे. देशात न्यायदानात जो विलंब होतो आहे, त्याप्रती चिंता व्यक्त करून काही लोकांनी लिहिले की आपल्या देशातील न्यायव्यवस्थेमध्ये सुधारणेची अत्यंत आवश्यकता आहे. अनेकांनी असे लिहिले की देशात ग्रीनफिल्ड शहरे उभारणे ही काळाची गरज आहे. काहींनी वाढत्या नैसर्गिक आपत्तींचा विचार मांडून शासन आणि प्रशासनात क्षमता निर्मितीसाठी एखादी मोहीम उभारण्याच्या सूचना केल्या. अंतराळात आता भारताचे अवकाश स्थानक लवकरात लवकर उभारले पाहिजे असे स्वप्न देखील अनेक लोकांनी पाहिले आहे. कोणी म्हणाले आहे की, जग आता समग्र उपचार पद्धतीकडे वळत असताना आपल्या भारताची जी पारंपरिक औषधोपचार पद्धती आहे त्यातील जी पारंपरिक औषधे आहेत त्यांना प्रोत्साहन देऊन जागतिक स्वास्थ्य केंद्राच्या स्वरुपात भारताला विकसित करणे आवश्यक आहे. काहींनी अशी देखील अपेक्षा व्यक्त केली आहे की भारत आता लवकरात लवकर जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली पाहिजे, त्यात उशीर व्हायला नको. माझ्या देशवासीयांनी ह्या सूचना केल्या आहेत म्हणून त्या मी तुम्हाला वाचून दाखवत होतो. माझ्या देशातील सामान्य नागरिकाने ह्या सूचना केल्या आहेत. मला वाटते की देशवासीयांचे असे व्यापक विचार असतील, देशवासीयांची इतकी भव्य स्वप्ने असतील, देशवासीयांच्या विचारांतून त्यांचे निर्धार दिसून येत असतील, तर आमच्यामध्ये देखील एक दृढनिश्चय निर्माण होतो, आमचा आत्मविश्वास नव्या उंचीवर पोहोचतो.

देशवासियांचा हा विश्वास म्हणजे एखादी बौद्धिक चर्चा नाही. हा विश्वास त्यांना आलेल्या अनुभवावर आधारित आहे. प्रदीर्घ काळ केलेल्या मेहनतीतून हा विश्वास जन्माला आला आहे. आणि म्हणूनच देशातील सामान्य माणसाला जेव्हा लाल किल्ल्यावरून सांगण्यात येते की, देशातील १८ हजार गावांमध्ये निर्धारित कालखंडात वीज जोडण्या दिल्या जातील आणि त्याप्रमाणे हे काम पूर्ण होते तेव्हा हा विश्वास अधिक मजबूत होतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर इतक्या वर्षांनी देखील देशातील अडीच कोटी घरांमध्ये वीज पोचलेली नाही, तेथे अंधाराचेच साम्राज्य आहे. तेव्हा त्या अडीच कोटी घरांपर्यंत वीज पोहोचवण्याचा निर्णय



होतो आणि त्याप्रमाणे तेथे वीज जोडण्या दिल्या जातात तेव्हा सामान्य नागरिकाचा विश्वास वृद्धींगत होतो. जेव्हा स्वच्छ भारत अभियानाचा विषय निघतो, तेव्हा या देशाच्या पहिल्या आघाडीतील लोक असोत, गावातील लोक असोत, गरीब वस्त्यांमध्ये राहणारे लोक असोत, लहान मुले असोत, प्रत्येक कुटुंबात स्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले असेल, स्वच्छतेची चर्चा होत असेल, स्वच्छतेचे महत्त्व एकमेकांना आवर्जून सांगण्याचा प्रयत्न होत असेल तर मला वाटते, हा भारतात निर्माण झालेल्या नव्या चैतन्याचे प्रतिबिंब आहे. जेव्हा लाल किल्ल्यावरून आपल्या देशातील लोकांना अशी माहिती देण्यात येते की, आज आपल्या देशात ३ कोटी कुटुंबे अशी आहेत ज्यांना नळाने पाणी उपलब्ध होत नाही, या घरांमध्ये नळाने पिण्याचे शुध्द पाणी पोहोचवण्याची गरज आहे.

इतक्या कमी वेळात १२ कोटी कुटुंबांना जल जीवन अभियानाअंतर्गत पाणी पोहोचत आहे. आज १५ कोटी कुटुंबे याचे लाभार्थी झाले आहेत. कोण वंचित होते व्यवस्थेपासून, कोण मागे राहिले होते, समाजातल्या वरच्या थरातल्या लोकांना या अभावाला तोंड द्यावे लागत नव्हते. माझ्या दलित, पीडित, शोषित, माझ्या आदिवासी बंधू-भगिनी, माझ्या गरीब बंधू-भगिनी, झोपडीमध्ये राहून स्वतःची गुजराण करणारे माझे लोक हेच या गोष्टींविना जगत होते. अशा प्राथमिक गोष्टींसाठी आम्ही जे प्रयत्न केले त्याचा लाभ समाजातल्या या आमच्या सर्व बंधू-भगिनींना मिळाला आहे. आम्ही 'व्होकल फॉर लोकल'चा मंत्र दिला आज मला आनंद आहे की व्होकल फॉर लोकल हा अर्थशास्त्रासाठी नवा मंत्र ठरला आहे. प्रत्येक जिल्हा आपल्या उत्पादनाचा अभिमान बाळगू लागला आहे. 'एक जिल्हा एक उत्पादन' असे वातावरण निर्माण झाले आहे. एक जिल्हा एक उत्पादन मधल्या उत्पादनांची निर्यात कशी करता येईल या दिशेने आमचे सर्व जिल्हे विचार करू लागले आहेत. नविकरणीय उर्जेचा संकल्प घेतला होता. जी-२० समूहाच्या देशांनी यासंदर्भात जितके केले आहे त्यापेक्षा जास्त कार्य भारताने केले आहे आणि भारताने उर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी, जागतिक तापमान वाढीच्या चिंतेपासून मुक्त होण्यासाठी आम्ही काम केले आहे.

सुधारणांप्रती आमची जी कटिबद्धता आहे, ती चार दिवस वाहवा मिळवण्यासाठी नाही, सुधारणांची आमची जी प्रक्रिया आहे ती कोणत्या नाईलाजातून आलेली नाही, देशाला सामर्थ्यवान करण्याच्या उद्देशाने या सुधारणा आहेत आणि म्हणूनच आज सांगू शकतो की सुधारणांचा आमचा मार्ग एक प्रकारे पथदर्शी आराखडा ठरला आहे. या आमच्या सुधारणा, विकास, हे परिवर्तन हे केवळ चर्चेसाठी, बुद्धीजीवी वर्गासाठी, तज्ज्ञांसाठी चर्चेकरिता विषय नाही. आम्ही राजकारण नाईलाज म्हणून केले नाही. आम्ही जे काम करतो ते राजकीय गुणाकार-भागाकार या दृष्टीकोनातून करत नाही, आमचा एकच संकल्प असतो,



'राष्ट्र सर्वप्रथम'. राष्ट्र सर्वप्रथम, राष्ट्रहित सर्वोच्च स्थानी, माझा भारत महान व्हावा हा संकल्प घेऊन आम्ही पाऊले उचलतो. जेव्हा सुधारणांची बाब येते, त्याचा एक प्रदीर्घ पट आहे. त्याची चर्चा करत बसलो तर कदाचित अनेक तास लागतील मात्र मी छोटेसे उदाहरण देऊ इच्छितो. बँकिंग क्षेत्रात ज्या सुधारणा झाल्या, आपण विचार करा, बँकिंग क्षेत्राची काय परिस्थिती होती, ना विकास होत होता, ना विस्तार होत होता, ना विश्वास वाढत होता इतकेच नव्हे तर ज्या प्रकारचे कारनामे झाले त्यामुळे आपल्या बँका संकटातून जात होत्या. आम्ही बँकिंग क्षेत्र मजबूत करण्यासाठी अनेक सुधारणा केल्या. त्यामुळे आज आपल्या बँका, जगातल्या ज्या मोजक्या मजबूत बँका आहेत त्यामध्ये भारताच्या बँकांनी आपले स्थान निर्माण केले आहे. आणि जेव्हा बँकांचा विषय येतो, तेव्हा औपचारिक अर्थव्यवस्थेचे सामर्थ्यही वाढते. जेव्हा बँक व्यवस्था नीट असते तेव्हा सामान्य विशेष करून गरीब कुटुंबाच्या ज्या गरजा असतात, त्या पूर्ण करण्याची सर्वात मोठी ताकद बँकिंग क्षेत्रात असते. जर त्याला गृह कर्ज हवे असेल त्याला वाहन कर्ज हवे असेल, माझ्या शेतकऱ्याला ट्रॅक्टरसाठी कर्ज हवे असेल, माझ्या युवावर्गाला स्टार्ट अपसाठी कर्ज हवे, माझ्या युवकांना शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज हवे असेल, परदेशात जाण्यासाठी कर्ज हवे असेल तेव्हा या सर्व बाबी शक्य होतात. मला तर आनंद आहे की माझे पशुपालकही, मत्स्यपालन करणाऱ्या बंधू-भगिनीही आज बँकांचा लाभ घेत आहेत. मला आनंद आहे की माझ्या लाखो फेरीवाल्या बंधू-भगिनी आज बँकांशी जोडले जाऊन आपली नवी परिमाणे साध्य करत आहेत आणि विकासाच्या वाटचालीत भागीदार होत आहेत. आपले सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, आपल्या लघु उद्योगांसाठी तर बँका सर्वात मोठ्या सहाय्यक असतात. त्यांना दररोज पैशांची आवश्यकता असते, आपल्या नित्य प्रगतीसाठी आणि आपल्या मजबूत बँकांमुळे हे काम शक्य झाले आहे.

आपल्या देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, आपल्याला स्वातंत्र्य तर प्राप्त झाले पण लोकांना दुर्दैवाने मायबाप संस्कृतीला सामोरे जावे लागले. सरकारकडे मागत राहा, सरकार पुढे हात पसरत राहा, कोणाची शिफारस मिळेल याचे मार्ग शोधत राहा, हीच संस्कृती फोफावली होती. आज प्रशासनाचे हे मॉडेल आम्ही बदलले आहे. आज सरकार स्वतः लाभार्थी, हितार्थ्यांकडे जात आहे. आज सरकार स्वतः त्याच्या घरी गॅस शेगडी पोहोचवत आहे. आज सरकार स्वतः त्याच्या घरी पाणी पोहोचवत आहे. आज सरकार स्वतः त्याच्या घरी वीज जोडणी देत आहे. आज सरकार स्वतः त्याला आर्थिक साहाय्य देत विकासाच्या नव्या आयामासाठी त्याला प्रेरित करत आहे, प्रोत्साहित करत आहे. आज सरकार स्वतः युवकांच्या कौशल्य विकासासाठी अनेक पाऊले उचलत आहे.

# पॅरिस ऑलिम्पिकमध्ये गेलेला प्रत्येक खेळाडू 'चॅम्पियन' : पंतप्रधान नरेंद्र मोदी








**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारतीय चमूबरोबर संवाद साधला. नवी दिल्लीत त्यांची भेट घेत असताना मोदी यांनी खेळाडूंकडून खेळातील अनुभव ऐकले आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या पराक्रमाचे कौतुक केले. पॅरिसला गेलेला प्रत्येक खेळाडू हा 'चॅम्पियन' आहे. भारत सरकार खेळांना पाठबळ देत राहील आणि उच्च दर्जाची क्रीडा पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतील, याचीही खात्री देण्यात येईल. समाज माध्यम 'एक्स' वर प्रसिदध केलेल्या संदेश मालिकेत पंतप्रधान म्हणाले; पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारतीय दलाशी संवाद साधताना आनंद झाला. त्यांचे खेळातील अनुभव ऐकले आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. पॅरिसला गेलेला प्रत्येक खेळाडू हा 'चॅम्पियन' आहे. भारत सरकार खेळांना समर्थन देत राहील आणि उच्च दर्जाची क्रीडा पायाभूत सुविधा निर्माण होईल हे सुनिश्चित करेल. ■

# शेती उत्पादन वाढविण्याला प्राधान्य

## केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांचा शेतकऱ्यांशी 'संवाद'



**स्वातंत्र्यदिनाच्या** कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांशी शिवराज सिंह चौहान यांनी संवाद साधला. यावेळी राष्ट्रीय कीटक निरीक्षण- दक्षता प्रणाली (एनपीएसएस) चा प्रारंभ करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यासाठी देशातील प्रत्येक गावातून शेतकरी बांधव आले आहेत. शेतकरी हा देशाचा आणि जनतेच्या हृदयाचा जणू ठोका आहे. शेतकऱ्यांनी जे उत्पादन घेतले ते पाहून प्रत्येकाचे हृदय धडधडत आहे. शेतकरी आमच्यासाठी देव आहे. अन्नदात्याला सुखी आणि समृद्ध करायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी प्रत्येक भाषणात शेतकऱ्यांविषयी आदरभावना व्यक्त केली. स्वातंत्र्य मिळाल्यापासून पंतप्रधान लाल किल्ल्यावर ध्वज फडकवत असतात, परंतु यापूर्वी कोणत्याही सरकारने स्वातंत्र्यदिनी शेतकऱ्यांना निमंत्रित केले नव्हते, कारण त्यांच्या दृष्टीने शेतकरी वर्गाला कधीच प्राधान्य दिले गेले नाही. मात्र यंदाच्या वर्षी शेतकरी बांधवांना खास निमंत्रण देण्यात आले होते, याबद्दल शिवराज सिंह चौहान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली आम्ही ६ प्रकारची कामे करणार आहोत यामध्ये उत्पादन वाढवणे हे पहिले काम आहे. उत्पादन वाढविण्यासाठी चांगल्या बियाण्यांची गरज आहे. अलीकडेच, पंतप्रधानांनी उच्च उत्पादन देणाऱ्या १०९ बियाण्यांची वाणे शेतकऱ्यांना समर्पित केली. शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. आमचे काम शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांना जोडण्याचे आहे. अनेकवेळा शेतकऱ्यांकडे माहिती नसल्याने ते चुकीचे कीटकनाशक वापरतात. त्यामुळे कीटकनाशकाबाबत माहिती घेणे महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांना विज्ञानाचे लाभ तातडीने मिळतील हे सुनिश्चित करण्यासाठी, आम्ही दर महिन्यात एकदा 'किसानोंकी बात' हा कार्यक्रम सुरु करणार आहोत, अशी माहिती देऊन केंद्रीय मंत्री म्हणाले की, रेडिओद्वारे प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमात वैज्ञानिक सहभागी असतील, कृषी विभागाचे अधिकारी असतील तसेच ते स्वतः देखील असतील आणि त्या कार्यक्रमातून शेतकऱ्यांना आवश्यक माहिती पुरवण्यात येईल. कृषी विज्ञान केंद्रांनी शेतकऱ्यांशी संपूर्णतः जोडले जाण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना वैज्ञानिक लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने पावले उचलण्यात येतील. आता लवकरच शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांच्यात चर्चा घडवून आणल्या जातील जेणेकरून आपण कृषी क्षेत्राच्या माध्यमातून जगाची फूड बास्केट बनण्याचा चमत्कार आपण घडवू शकू. यापूर्वीच्या सरकारांच्या काळातील अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी केवळ २७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत होती, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही तरतूद वाढवून १.५२ लाख कोटी रुपये केली. शेतकऱ्यांना अनुदानित दरात खते मिळत आहेत. आजकाल ज्या लोकांचा शेतीशी काहीही संबंध नाही असे लोक शेतकऱ्यांविषयी बोलतात. त्यांनी शेत पाहिलेले नसते, पिके पाहिलेली नसतात, अगदी गव्हाचे रोप कसे दिसते हे देखील त्यांना माहीत नसते. ■

# समर्पित राजकारणाचा आदर्श



● प्रदीप पाटील

भारतीय जनता पार्टीच्या आजवरच्या वाटचालीत उल्लेखनीय योगदान दिलेल्यांमध्ये सुषमाजींचे नाव अग्रस्थानामध्ये नोंदले गेले आहे. पक्षासाठी स्वतःला समर्पित केलेल्या सुषमाजींनी पक्षाचा प्रत्येक आदेश पाळला. १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या विरोधात कर्नाटकातील बेल्लारी मतदारसंघातून लढण्याचा पक्षाचा आदेश प्रमाण मानून त्यांनी निवडणूक लढवली. सुषमाजींना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त वाहिलेली आदरांजली.

**अमोघ** वक्तृत्व, इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, प्रभावी नेतृत्व कौशल्य, पक्षाचा आक्रमक पण संयत चेहरा अशी ओळख असलेल्या सुषमा स्वराज यांचा जन्म हरीयाणातील अंबाला येथे १४ फेब्रुवारी १९५२ साली झाला. त्यांचे वडील हरदेव शर्मा हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय स्वयंसेवक होते. त्यामुळे सुरूवातीपासूनच त्या संघांची संबंधित होत्या.

अंबाला येथील सनातन धर्म महाविद्यालयातून संस्कृत व राज्य शास्त्र ह्या विषयात त्यांनी बी. ए. केले व पुढे पंजाब विद्यापीठातून कायद्यांचे शिक्षण घेतले. १९७० नंतर पुढे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतील आंदोलनात्मक आणि राजकीय कारकीर्दीस सुरूवात झाली. २०१४ पासून ते २०१९ पर्यंत त्या भारताच्या परराष्ट्र मंत्री होत्या. माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधीनंतर हे पद स्विकारणाऱ्या त्या दुसऱ्या महिला होत्या. १९७७ मध्ये वयाच्या २५ व्या वर्षी हरीयाणा सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री तेव्हा, त्या देशातील सर्वात कमी वयाच्या कॅबिनेट मंत्री होत्या. १९९८ मध्ये त्यांनी दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून पदभार सांभाळला. त्यांनी १३ ऑक्टोबर १९९८ पासून ३ डिसेंबर १९९८ पर्यंत दिल्लीच्या पाचव्या मुख्यमंत्री म्हणून काम केले.

२०००-२००९ ह्या काळात त्या राज्यसभा सदस्य होत्या. त्यांनी माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये माहिती आणि प्रसारण मंत्री, दूरसंचार मंत्री, आरोग्य मंत्री आणि संसदीय कामकाज मंत्री अशी मंत्री पदे

सांभाळली आहेत. त्या डिसेंबर २००९ ते २०१४ दरम्यान लोकसभेत विरोधी पक्ष नेत्या होत्या, त्या काळातील त्यांचे कार्य प्रशंसनीय व अविस्मरणीय असे होते.

२००९ च्या लोकसभा निवडणुकीत त्या मध्य प्रदेशातील विदिशा लोकसभा मतदारसंघातून निवडून लोकसभेवर आल्या होत्या. २०१४ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीत त्या दुसऱ्यांदा विदिशा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आल्या होत्या. ४ लाखांपेक्षा अधिक मतांच्या फरकाने निवडून आल्या होत्या. २०१४ मध्ये त्या परराष्ट्र मंत्री होत्या. २०२० मध्ये त्यांना सार्वजनिक व्यवहार क्षेत्रातील मरणोत्तर पद्मविभूषण हा भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. ८ नोव्हेंबर २०२१ रोजी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबियांना प्रदान करण्यात आला.

भारतीय जनता पार्टीच्या जडणघडणीत सुषमा स्वराज यांनी मोठे योगदान दिले आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्या सारख्या ज्येष्ठ नेत्यांबरोबर त्यांनी काम केले. स्वकर्तुत्वाने त्यांचे नेतृत्व बहरले, धारदार वक्तृत्व हा त्यांचा सर्वात मोठा गुण होता. त्या जोरावरच त्यांनी राजकारणातले आपले स्थान भक्कम केले. सुषमाजींच्या नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व, कार्यशैलीचा ठसा कायम राहील. काही व्यक्तींच्या कार्यप्रवण स्मृति सदैव प्रेरणा देतात, त्यापैकीच एक म्हणजे सुषमा स्वराज. अमोघ वक्तृत्वाने जनमानसांना प्रभावित करणाऱ्या भारतीय राजकारणातील कणखर नेत्या. माजी परराष्ट्रमंत्री आणि भाजपाच्या जडणघडणीतील रणरागिणी म्हणून सुषमा स्वराज ओळखल्या जातात. तेजस्वी व्यक्तीमत्व देश असो की, विदेश संसद असो की संयुक्त राष्ट्रांची महासभा ह्या सर्व ठिकाणी त्यांनी आपल्या ओजस्वी वक्तृत्वाने अमिट ठसा उमटविला. वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली १३ दिवसांचे सरकार होते, त्यावेळी सुषमा स्वराज ज्या भावनावेगाने भारतीय पौराणिक कथांचे दाखले देत आपल्या भाषणातून मुद्दे मांडत होत्या, ते ऐकताना पत्रकार इतके मंत्रमुग्ध झाले होते की पाच मिनिटांनंतर त्यांनी लिहिणे बंद केले होते. ही आठवण त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वाची साक्ष देण्यास पुरेशी ठरावी. २०१५ व २०१८ मधील संयुक्त राष्ट्र संघातील त्यांचे भाषण ही 'न भुतो न भविष्यती' असे ठरले. परिणामकारक प्रशासकीय कौशल्य आणि प्रभावी निर्णय क्षमतेचे अनेक आदर्श त्यांनी घालून दिले. १९७० मध्ये त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परीषदेच्या माध्यमातून आपली राजकीय कारकीर्द सुरूवात केली. स्व.लोकनेते जयप्रकाश नारायण यांच्या आणिबाणी आंदोलनात त्यांचा सहभाग होता. त्यानंतर त्यांनी भाजपाचे सदस्यत्व स्विकारले. त्यांनी पक्षादेशाचे सन्मानाने पालन केले. इतकेच नव्हे तर आपली घराणेशाही रुजविण्याचा विचारही कटाक्षाने टाळला नि:पक्ष, स्वच्छ आणि समर्पित राजकारणाचा त्यांनी घालून दिलेला आदर्श वस्तुपाठ भारतीय राजकारणातील नविन पिढी गिरवत राहील हे निश्चित!



सुशील, सुसंस्कृत, सुस्वभावी असलेल्या सुषमा स्वराज यांच्या व्यक्तीमत्वात दुर्गा आणि सरस्वती यांचे दर्शन घडायचे. त्यांची कारकीर्द सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आमदार, खासदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री अशी विविध पदे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने मिळविली. मोदी सरकारच्या पहिल्या मंत्री मंडळात परराष्ट्र मंत्री असलेल्या सुषमा स्वराज यांनी ट्विटरद्वारे परराष्ट्र मंत्रालयाला जनसामान्यांपर्यंत पोहचविले. परराष्ट्र मंत्री असताना सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा त्यांचा उपक्रम स्तुत्य होता. महिलांसाठी त्या आदर्श नेत्या होत्या. ■

# ठाकरेंचे वक्तव्य नैराश्याचे द्योतक

● केशव उपाध्ये, प्रदेश मुख्य प्रवक्ते

उद्धव ठाकरेंची अवस्था सध्या अंगी नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ अशी झाली आहे. एकतर तू राहीन, नाहीतर मी राहीन, भारतीय जनता पार्टीची कबर खोदा, यासारखी विधाने उद्धव ठाकरे सध्या करीत आहेत. केवळ अल्पसंख्याक वर्गाच्या मतांमुळे लोकसभा निवडणुकीत यश मिळालेल्या उद्धव ठाकरेंना आता वस्तुस्थितीचे चटके जाणवू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत केलेला खोटा प्रचार आता कामी येणार नाही हे लक्षात आल्याने त्यांच्या भाषेचा दर्जा घसरला आहे.

**'एक** तर तू राहशील नाही तर मी राहीन,' अशी भाषा उद्धव ठाकरे करू लागले आहेत. विश्वासघात करून आणि महत्प्रयासाने मिळवलेले मुख्यमंत्रीपद अडीच वर्षांत गमवावे लागल्याने आलेले वैफल्यच त्यांच्या भाषेतून प्रकट होते. भाजपच्या नेतृत्वाने अपयशाचे असे कडू घोट अनेक वर्षे पचवले आहेत. त्यातून धडे घेत पक्षाची वाटचाल अखंडपणे सुरू आहे. उद्धव ठाकरे अशी विखारी टीका करण्यापेक्षा आपल्याच पक्षातील ४०-५० आमदार का बाहेर पडले, याचा विचार का करत नाहीत? उद्धव ठाकरे यांची टोमणे मारण्याची सवय महाराष्ट्राला ठाऊक आहे. पण अलीकडे त्यांनी,'एक तर तू राहशील नाही तर मी', अशी आरोळी ठोकली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून उद्धव ठाकरे यांनी ही आरोळी ठोकली आहे. रुग्णशय्येवर पडलेल्या एखाद्या रुग्णाला अपघाताने एखादी संजीवनी मिळावी आणि त्याला नवजीवन प्राप्त व्हावे, तसाच असा प्रकार उद्धव ठाकरे यांच्याबाबतीत नुकत्याच



झालेल्या लोकसभा निवडणुकीत घडला. लोकसभा निवडणुकीत मुस्लीम समाजाने केलेल्या एकतर्फी मतदानामुळे उद्धव ठाकरे, काँग्रेस आणि शरद पवारांच्या महाविकास आघाडीला नवसंजीवनी प्राप्त झाली. २०२४ पर्यंतच्या लोकसभा निवडणुकीत मुस्लीम समाजाने कधीही एवढे एकतर्फी, एकजुटीने आणि एवढ्या मोठ्या संख्येने मतदान केले नव्हते. पूर्वीच्या निवडणुकांपेक्षा मुस्लीम मतदानात सरसकट वाढ दिसत असल्याचा, ढोबळ अंदाज आहे. याचा अर्थ प्रत्येक मतदारसंघात, एकूण मतदार संख्येपैकी मुस्लीम मतदारांचे मतदान ७० ते ८० टक्के झाले असावे. हे वाढलेले मतदान महाविकास आघाडीच्या पारड्यात पडल्याने आघाडीला ३१ जागा मिळाल्या.

'व्होट जिहाद'ची मात्रा आणि संविधान बदलाच्या अफवेचा परिणाम महाविकास आघाडीच्या कामगिरीवर झाला. त्यामुळेच तोळामासा तब्येत असलेला सिक्स पॅक ॲब्स कमावलेल्या व्यक्तीला आव्हान देऊ लागतो तसे काहीसे उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देऊ लागले आहेत. नागरिकत्व सुधारणा कायदा अर्थात सीएए कायद्याचा वापर करून तुम्हाला देशाबाहेर काढले जाईल, अशी भीती दाखवून मुस्लीम समाजाला भारतीय जनता पक्षाच्या विरोधात उतरवण्याचे कारस्थान काही मंडळींनी देशभर केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आगामी काही वर्षात जागतिक पटलावर वेगाने स्वतंत्र स्थान निर्माण करण्याची शक्यता दिसू लागल्याने काही परकीय शक्तींनी देशातील भाजप विरोधकांना हाताशी धरत मुस्लिमांना देशाबाहेर काढणार, अनुसूचित जाती-जमातींचे आरक्षण रद्द करणार, संविधान बदलणार यासारख्या अनेक अफवा पसरवल्या. परिणामी

**'महाविकास आघाडी' च्या नुकत्याच झालेल्या मेळाव्यात शरद पवार व काँग्रेसने उद्धव ठाकरेंची दखलही घेतली नाही. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून जाहीर करण्यास शरद पवार, काँग्रेसने नकार दिला आहे. आता कोणालाही मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून जाहीर करा, मी पाठिंबा देईन, अशी भाषा उद्धव ठाकरे वापरू लागले आहेत. त्यांना आता महाविकास आघाडीचे आश्रीत म्हणूनच राहावे लागणार आहे.**

मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. त्याचा फायदा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला आणि महाविकास आघाडीला झाला. या यशामुळेच उद्धव ठाकरेंना चेव चढला आहे.

देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देताना आपण मोठे शूरवीर, निधड्या छातीचे आहोत, असा आव त्यांनी आणला आहे. राजकारणात स्पर्धा, ईर्षा अभिप्रेतच आहे. मात्र या स्पर्धेची, ईर्षेची सीमारेषा असते. महाराष्ट्रात आजवर ही सीमारेषा ओलांडण्याचे पातक कोणीही केले नव्हते. उद्धव ठाकरेंनी राजकारणाच्या खेळातील सभ्यतेच्या सर्व सीमा पार केल्या आहेत.

राजकारणात लढताना नैतिक पातळीवर किती घसरायचे याचे भान उद्धव ठाकरेंनी केव्हाच गमावले होते. २०१४च्या विधानसभा निवडणुकीतच त्याचे दाखले मिळाले होते. त्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील महायुतीला ४८ पैकी ४२ जागा मिळाल्या होत्या. या यशामुळे उद्धव ठाकरेंची अनेक वर्षांची मुख्यमंत्रीपदाची लालसा उफाळून वर आली. त्यामुळे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत जागा वाटपावरून आडमुठी भूमिका घेत २५ वर्षांची भाजपबरोबरची युती तोडण्यापर्यंत त्यांची मजल गेली. स्वबळावर बहुमत न मिळाल्याने त्यांना नाइलाजाने भाजपबरोबर राज्य सरकारमधील सत्तेत सहभागी व्हावे लागले.

२०१४ ते २०१९ या काळात केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाबरोबर सत्ता उपभोगणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीला मागे टाकत विरोधकाची भूमिकाही बजावली. मोदी सरकार आणि भाजपला अखंड शिव्याशाप देणाऱ्या उद्धव ठाकरे यांना भाजप नेतृत्वाने केवळ वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना स्मरत सहन केले. अनेक वर्षांचा हिंदुत्वाचा साथीदार याच भूमिकेतून भाजप नेतृत्वाने सामोपचाराची भूमिका घेतली. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी भाजप आणि शिवसेना युतीला स्पष्ट बहुमताचा कौल दिला होता. मात्र २०१४ पेक्षा भाजपच्या जागा १९ ने कमी झाल्या होत्या. बहुमताच्या गणितातील ही छोटी फट लक्षात घेत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाची आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी भाजपची साथ सोडत काँग्रेस-राष्ट्रवादीशी घरोबा केला. युद्धात आणि राजकारणात नीती- अनीतीचे संकेत असतात. युद्धात आणि राजकारणातही अनीतीने काही काळ निश्चितच फायदा होऊ शकतो. मात्र अनीतीच्या मार्गाने जाण्याचे दीर्घकालीन तोटेही असतात. या मार्गाने गेल्यामुळे होणारे नुकसान कधीच भरून निघत नाही. रामायण आणि महाभारतात अनीतीने वागणाऱ्या रावण आणि कौरव सेनेला अंतिमत: संपूर्ण पराजयच पत्करावा लागला होता.

विश्वासघात करून आणि महत्प्रयासाने मिळवलेले मुख्यमंत्रीपद अडीच वर्षांत गमवावे लागल्याने उद्धव ठाकरे यांना आलेले वैफल्य त्यांच्या अभद्र भाषेतून प्रकट होते. लोकसभा निवडणुकीत पसरवलेल्या खोट्यानाट्या गोष्टींचे नाणे विधानसभा निवडणुकीत चालणार नाही. विधानसभा निवडणुकीतील यश-अपयशाची समीकरणे अत्यंत वेगळी असतात. लोकसभा निवडणुकीत वापरलेली खोट्या प्रचाराची अनीती विधानसभा निवडणुकीवेळी उपयुक्त ठरणार नाही, हे हळूहळू लक्षात येऊ लागल्याने उद्धव ठाकरेंचे वैफल्य दिवसागणिक वाढू लागले आहे. त्यातूनच 'एक तर तू राहशील नाही तर मी राहीन,' यासारखी भाषा त्यांच्या तोंडून ऐकू येते. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने राजकारणातील पीछेहाट, अपयश याचे अनेक कडू घोट अनेक वर्षे पचवले आहेत. प्रत्येक पीछेहाटीतून धडे घेत या पक्षाची वाटचाल अखंडपणे सुरू आहे. आपल्याच पक्षातील ४०-५० आमदार का बाहेर पडतात, याचा विचार करण्याची गरज न भासलेले उद्धव ठाकरे राजकारणातले प्राथमिक धडेही विसरून गेले असल्याचे दिसते. त्यांनी कितीही डरकाळ्या फोडल्या तरी त्यांना आणि महाविकास आघाडीला महायुतीचा विजयरथ थांबविता येणार नाही.

**(सौजन्य: दै.लोकसत्ता)**

# ... हा तर गोरगरीब मुस्लिमांच्या विकासाला विरोध

> वक्फ दुरूस्ती विधेयकाला अपेक्षेप्रमाणे काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आदी विरोधी पक्षांनी प्रखर विरोध केला आहे. हे दुरूस्ती विधेयक आणण्यामागचे उद्देश केंद्र सरकारने विस्ताराने स्पष्ट केले आहेत. असे असतानाही या विधेयकाला होणाऱ्या विरोधामागचा हेतू या मंडळींच्या आजवरच्या राजकीय वाटचालीला साजेसा ठरणारा आहे.

**२००४** ते २०१४ या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सत्तेत असताना मुस्लिमांच्या विकासाचा आढावा घेण्यासाठी सच्चर समिती आणि संयुक्त संसदीय समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या दोन्ही समित्यांनी वक्फ बोर्डाच्या कामकाजातील अनेक त्रुटी दाखवून दिल्या होत्या. या समित्यांनी केलेल्या शिफारशींच्या आधारेच हे दुरूस्ती विधेयक तयार करण्यात आले आहे. वक्फ बोर्डावर कब्जा असणाऱ्या मुस्लीम धर्मियातील मुठभर 'आहे रे' मंडळींनाच या बोर्डाच्या कामकाजातून अनेक लाभ मिळाले आहेत. मात्र मुस्लीम समाजातील 'नाही रे' वर्ग वक्फच्या अपेक्षित फायद्यापासून वंचितच राहिला आहे. देशभरातील वक्फ बोर्डांच्या कामकाजातील गैरप्रकारांबद्दल मुस्लीम समाजातीलच अनेकांनी गंभीर तक्रारी केल्या होत्या. वक्फ बोर्ड हे माफियांचे अड्डे बनले असल्याची तक्रार काही विरोधी खासदारांनीच सरकारकडे केली होती. महाराष्ट्रासह काही राज्यात वक्फ बोर्डाच्या जमिनीचे घोटाळेही उजेडात आले होते. या पार्श्वभूमीवर वक्फ दुरूस्ती विधेयक संसदेत सादर करण्यात आले आहे. या विधेयकामुळे मुस्लीम धर्मातील प्रस्थापित मंडळींचे हितसंबंध धोक्यात आल्याने या विधेयकाला विरोध होत आहे.

राज्या-राज्यातील वक्फ बोर्ड राजकारणात मग्न झाले आहेत. या बोर्डांकडून सामान्य मुस्लिमांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत आहे, असे सच्चर समिती आणि संयुक्त संसदीय समितीच्या अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. केंद्र सरकारने सध्या अस्तित्वात असलेला वक्फ कायदा रद्द केला नसून त्यातील काही तरतुदींमध्ये बदल करण्याचा प्रयत्न या विधेयकाद्वारे केला आहे. वक्फ बोर्डांना कोणतीही संपत्ती 'वक्फ' (दान) ठरविण्याचे अनिर्बंध अधिकार आहेत. हा अधिकार रद्द करण्याची तरतूद दुरूस्ती विधेयकात करण्यात आली आहे. वक्फ बोर्डाच्या कारभाराला शिस्त लावण्यासाठी, या बोर्डांकडे जमा होणाऱ्या महसूलाचा, संपत्तीचा हिशोब योग्य पद्धतीने ठेवला जावा, या हेतूने १९७६ मध्ये केंद्र सरकारने समिती नियुक्ती केली होती. या समितीने देशभरातील वक्फ बोर्डांकडील मालमत्तांचा आढावा घेतला होता. त्याच्या आधारे दुरूस्ती विधेयकात काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. वक्फ म्हणून मालमत्ता नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या अर्जांची वैधता तपासणे व त्याचे अहवाल बोर्डाला सादर करणे बंधनकारक आहे. मालमत्ता नोंदणीसाठी येणाऱ्या अर्जांची वैधता तपासून त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार दुरूस्ती विधेयकाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

केंद्रीय वक्फ बोर्ड आणि राज्या-राज्यातील वक्फ बोर्ड यामध्ये मुस्लीम धर्मियांबरोबरच अन्य धर्मियांनाही प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद दुरूस्ती विधेयकात करण्यात आली आहे. वक्फ बोर्डांवर दोन महिलांची नियुक्तीही बंधनकारक करण्यात आली आहे. १९५५ च्या मूळ वक्फ कायद्यात वक्फ बोर्डाच्या लवादाकडून (न्यायाधीकरण) दिलेल्या जाणाऱ्या निर्णयांना न्यायालयात आव्हान देता



येणार नाही, अशी तरतूद आहे. भारतीय राज्य घटनेच्या मूलभूत तत्वाच्या विरोधात असणारी ही तरतूद दुरूस्ती विधेयकाद्वारे रद्द करण्यात येणार आहे. वक्फ बोर्डानी केलेल्या अतिक्रमणाच्या विरोधात अनेक तक्रारी झाल्या आहेत. वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांविरोधातही अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. याची दखल कोणत्याच पातळीवर घेतली जात नव्हती. आता दुरूस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यावर वक्फ बोर्डाच्या मनमानीला चाप बसणार आहे. गोरगरीब मुस्लीम धर्मियांच्या कल्याणासाठी वक्फ बोर्डाचा वापर व्हावा, अशी अपेक्षा होती. मुस्लीम समाजातील धनदांडग्या मंडळींनी ही अपेक्षा प्रत्यक्षात येऊ दिली नाही. वक्फ कायद्यानुसार कोणतीही संपत्ती वक्फ म्हणून घोषित करण्याचा अधिकार वक्फ बोर्डांना देण्यात आला होता. एखाद्या जमिनीवर, जागेवर आमचे पूर्वज शेकडो वर्षापूर्वी नमाज पठण करत होते, असा दावा एखाद्या मुस्लीम नागरिकाने केला तर ती जमीन, जागा वक्फ म्हणून घोषित केली जात असे. गुजरातमधील सुरत महापालिकेचे मुख्यालय याच तरतुदीनुसार वक्फ घोषित करण्यात आले. देशभरात असे अनेक प्रकार घडल्याच्या तक्रारी आहेत. या तक्रारींची दखल घेत वक्फ बोर्डांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी वक्फ दुरूस्ती विधेयकात तरतूदी करण्यात आल्या आहेत. वक्फ संपत्ती, वक्फ मंडळ हा आमचा धार्मिक विषय आहे, त्यात सरकारने हस्तक्षेप करणे अयोग्य आहे, अशी टीका 'एमआयएम'ने केली आहे. देशाच्या सर्व नागरिकांसाठी एकच संविधान लागू असताना वक्फ कायद्यासारखे कायदे अस्तित्वात कसे असू शकतात, असा प्रश्न काँग्रेससह एकाही विरोधी नेत्याने उपस्थित केलेला नाही. शाहबानो या मुस्लीम महिलेला पोटगी द्यावी असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने १९८५ मध्ये दिल्यानंतर त्याविरोधात मुस्लीम धर्माच्या ठेकेदारांनी एकच काहूर उठवले होते. या ठेकेदारांनी आणलेल्या दबावामुळे त्यावेळच्या राजीव गांधी सरकारने घटना दुरूस्ती करत मुस्लीम महिलेचा पोटगी मागण्याचा अधिकार हिरावून घेतला. त्यावेळीही मुस्लीम महिलांना न्याय मिळावा, यासाठी देशातील पुरोगामी बुद्धिवंत, विचारवंत राजीव गांधी सरकारविरोधात सक्रिय झाले नव्हते. देशभरात ८ लाख एकरपेक्षा अधिक जमीनीची मालकी असलेले वक्फ बोर्ड अलिकडच्या काळात गैरप्रकारांमुळे चर्चेत आले आहेत.

या बोर्डांना शिस्त लावून गोरगरीब मुस्लिमांना त्याचा फायदा देण्याचा उद्देश दुरूस्ती विधेयकामुळे साध्य होणार आहे. या धर्माचे स्वयंघोषित ठेकेदार या विधेयकामुळे संतप्त होणे स्वाभाविकच आहे. आपली दुकानदारी संपून जाईल, या भीतीने ही मंडळी या विधेयकाला विरोध करत आहेत. मुस्लीम धर्मातील प्रस्थापितांना आपल्या धर्मातील वंचित वर्गाचा विकास होऊ द्यायची इच्छाच नाही. ही प्रस्थापित मंडळी निवडणुकीत भाजपा विरोधकांमागे आपली ताकद कशी उभी करतात हे लोकसभा निवडणुकीत दिसले आहेच. या प्रस्थापितांना चुचकारण्यासाठीच काँग्रेस सह सर्व विरोधी पक्ष या विधेयकाला विरोध करीत आहेत. ■



# अन्नदाता शेतकरी

## अन्नदाता डाळी-तेळलबिया उत्पादनातही होईल स्वयंपूर्ण

देशाच्या विकासात शेतकऱ्यांचे योगदान लक्षात घेऊन त्यांचे उत्पन्न वाढवण्यापासून ते समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली आहे. सरकारने नैसर्गिक शेती, कृषी संशोधन आणि तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांना फळे आणि भाजीपाला उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी जलद गतीने काम करण्याचा निर्णय घेतला आहे. आता सरकारने ठरवले आहे की, देशातील शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली देश डाळी आणि तेलबियांमध्येही आत्मनिर्भर बनेल.

**४००** जिल्ह्यांमध्ये डीपीआयच्या माध्यमातून खरीप पिकांचे डिजीटल सर्वेक्षण.

**१०** हजार आवश्यकता आधारित जैव इनपुट संसाधन केंद्रांची स्थापना.

**०१** कोटी शेतकऱ्यांना प्रमाणीकरण आणि ब्रँडिंगच्या माध्यमातून देशभरात नैसर्गिक शेतीसाठी मजबूत पाठिंबा.

**१.५२** लाख कोटी रूपयांची तरतूद आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कृषी आणि संबंधित क्षेत्रांसाठी करण्यात आली आहे.

### परिवर्तनात्मक कृषी संशोधन

केंद्र सरकारने अर्थसंकल्पात कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी हवामानाला अनुकूल वाणांच्या विकासावर भर देण्यासाठी कृषी संशोधन व्यवस्थेचा व्यापक आढावा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये खासगी क्षेत्राचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकार आणि अशासकीय क्षेत्रातील तज्ज्ञ अशा संशोधनावर देखरेख ठेवतील.

**देशातील शेतकऱ्यांकडे या अर्थसंकल्पात विशेष लक्ष देण्यात आले आहे. जगातील सर्वात मोठ्या धान्य साठवणूक योजनेनंतर आता आपण भाजीपाला उत्पादन समूह तयार करणार आहोत. त्यामुळे एकीकडे छोट्या शेतकऱ्यांना फळे, भाजीपाला आणि इतर उत्पादनांसाठी नवीन बाजारपेठ मिळेल आणि चांगला भाव मिळेल. तर दुसरीकडे आपल्या मध्यमवर्गीयांसाठी फळे आणि भाज्यांची उपलब्धता वाढेल आणि कुटुंबासाठी पोषण देखील सुनिश्चित होईल. कृषी क्षेत्रात भारताने स्वयंपूर्ण बनणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच डाळी आणि तेलबियांचे उत्पादन वाढवण्यात शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या उपाययोजना जाहीर करण्यात आल्या.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### नैसर्गिक शेती

आगामी दोन वर्षात देशभरातील एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी मदत पुरवली जाईल. शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देखील मिळेल आणि नैसर्गिक शेतीच्या ब्रँडिंगची देखील व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी वैज्ञानिक संस्था आणि इच्छुक ग्रामपंचायतींच्या माध्यमातून केली जाईल. १० हजार आवश्यकता आधारित जैव इनपुट संसाधन केंद्रांची स्थापना केली जाईल.

### डाळी आणि तेलबिया अभियान

डाळी आणि तेलबियांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी या पिकांच्या उत्पादनापासून ते साठवणूक आणि विपणनापर्यंतची संपूर्ण व्यवस्था मजबूत करण्याचे सरकारने ठरवले आहे. मोहरी, शेंगदाणे, तीळ, सोयाबीन आणि सूर्यफूलसारख्या तेलबिया पिकांमध्ये आत्मनिर्भर होण्यासाठी एक कृती धोरण आखले जात आहे.

### भाजीपाला उत्पादन आणि पुरवठा व्यवस्था

ग्राहक केंद्रांजवळ मोठ्या प्रमाणात भाजीपाला उत्पादन क्लस्टर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उत्पादनाचे संकलन, साठवणूक आणि विपणनासह भाजीपाला पुरवठा व्यवस्थेसाठी शेतकरी आणि उत्पादक संस्था, सहकारी संस्था आणि स्टार्ट अप यांना प्रोत्साहन देण्यात येईल.

### डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा

केंद्र सरकार राज्य सरकारांच्या सहकार्याने कृषी क्षेत्रात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (डीपीआय) लागू करण्यात मदत करेल. येत्या तीन वर्षात ते पूर्ण केले जाईल. यावर्षी डीपीआय वापरून ४०० जिल्ह्यांमध्ये खरीप पिकांचे डिजिटल सर्वेक्षण केले जाईल. ६ कोटी शेतकरी आणि त्यांच्या जमिनींचा तपशील जमीनींच्या नोंदणीमध्ये नोंदवला जाईल. याशिवाय ५ राज्यांमध्ये जनसमर्थ आधारित क्रेडिट कार्ड जारी केले जातील.

### भूमी अभिलेख विभागाची स्थापना

वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, ग्रामीण क्षेत्रातील जमिनीशी संबंधित कामांमध्ये सर्व भूखंडांसाठी विशिष्ट भूखंड ओळख क्रमांक (U L P I N) किंवा भू–आधार निर्धारित करणे, संवर्गीय नकाशांचे डिजिटलीकरण, सध्याच्या मालकीनुसार नकाशा उपविभागांचे सर्वेक्षण, भूमी अभिलेख विभागाची स्थापना आणि ते शेतकरी नोंदणी शाखेशी संलग्न करणे समाविष्ट आहे. या कामांमुळे कर्ज पुरवठा आणि इतर कृषी सेवा देखील सुलभ होतील.

### कोळंबी उत्पादन आणि निर्यात

कोळंबीसाठी न्यूक्लियस प्रजनन केंद्रांचे नेटवर्क उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. कोळंबी शेती, प्रक्रिया आणि निर्यातीसाठी नाबार्डच्या माध्यमातून वित्तपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### राष्ट्रीय सहकार धोरण

सहकार क्षेत्राच्या पद्धतशीर, व्यवस्थित आणि सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सहकार धोरण आणण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या धोरणाचा उद्देश ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती देणे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. ■



# 4 कोटी युवकांना रोजगार देणार

**दरमहा ५ हजार रुपये प्रशिक्षण भत्ता देणार**

भारताची वाढती ताकद देशाची युवा शक्ती आहे आणि ही युवा शक्ती अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकारने अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अभूतपूर्व संधी उपलब्ध करून देणे ही सरकारची ओळख बनली आहे. अर्थसंकल्पात सरकारकडून अनेक अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे देशात कोट्यवधी नवीन रोजगार निर्माण होतील. कौशल्य विकास आणि उच्च शिक्षणासाठी मदत असो किंवा मग एक कोटी युवकांसाठी 'इंटर्नशिप योजना असो, अशा प्रकारच्या निर्णयांमुळे युवकांसाठी संधींची नवी दारे होणार खुली...

**४.१** कोटी युवकांना रोजगार, कौशल्य विकास आणि इतर संधी उपलब्ध करून देण्याची घोषणा.

**२** कोटी रुपयांच्या केंद्रीय सहाय्याची तरतूद रोजगार आणि कौशल्ये विकासासाठी केली आहे.

**१** हजार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना आधुनिक पद्धतीने विकसित केले जाईल.

**५** हजार रुपये प्रति महिना प्रशिक्षण भत्ता आणि ६ हजार रुपयांची एक रकमी मदत दिली जाईल.

**२१** ते २४ वयोगटातील जे युवक बेरोजगार आहेत आणि कोणत्याही शिक्षणात पूर्णपणे सहभागी नाहीत, ते या योजनेसाठी पात्र असतील.

**१** कोटी युवकांना इंटर्नशिप, देशातील ५०० अव्वल कंपन्यांमध्ये पाच वर्षांच्या काळात प्रशिक्षणाची संधी.

**सरकारने युवकांच्या रोजगार आणि नोकऱ्यांवर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले आहे. यामुळेच सरकारने अर्थसंकल्पात रोजगार संलग्न प्रोत्साहन योजनेची घोषणा केली आहे. त्यामुळे देशात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. आयुष्यातील पहिली नोकरी मिळवणाऱ्या युवकांचा पहिला पगार देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. युवकांना देशातील अग्रगण्य कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळेल. यासाठी सरकारने विशेष व्यवस्था केली आहे. पंतप्रधान पॅकेजअंतर्गत पाच वर्षांच्या कालावधीत ४.१ कोटी युवकांना रोजगार, कौशल्य विकास आणि इतर संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दोन लाख कोटी रुपयांचे केंद्रीय सहाय्य देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. देशातील ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील आहे, त्यामुळे सरकारच्या प्राधान्यक्रमांमध्ये हा वयोगट सर्वात वर आहे कारण विकसित राष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्यात हीच ताकद सर्वात पुढे आहे.**

### रोजगार प्रोत्साहनाच्या तीन योजना

पंतप्रधान पॅकेजचा भाग म्हणून अर्थसंकल्पात रोजगार संलग्न प्रोत्साहनासाठी तीन योजना लागू करण्याची घोषणा सरकारने केली आहे. या योजना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी–ईपीएफओमधील नावनोंदणीवर आधारित असतील, प्रथमच नोकरी करणाऱ्यांना ओळख मिळवून देण्यात मदत करतील आणि रोजगार देणाऱ्यांना आणि रोजगार प्राप्त करणाऱ्यांना सहकार्य करतील.

### १ प्रथमच नोकरी करणारे

या योजनेत सर्व औपचारिक क्षेत्रांमध्ये नव्याने रुजू होणाऱ्या सर्व व्यक्तींना एक महिन्याचे वेतन दिले जाईल. ईपीएफओमध्ये नोंदणीकृत प्रथमच नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला एका महिन्याच्या पगाराचे थेट लाभ हस्तांतरण ३ हप्त्यांमध्ये केले जाईल जे कमाल १५,००० रुपये पर्यंत असेल. यासाठी पात्रता मर्यादा १ लाख रुपये मासिक वेतन असेल. या योजनेचा २ कोटी १० लाख युवकांना लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.



### २. उत्पादन क्षेत्रात रोजगार

या योजनेअंतर्गत प्रथमच रोजगार मिळालेल्या ३० लाख युवकांना आणि त्यांच्या नियोक्त्यांना लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. या अंतर्गत कर्मचारी आणि नियोक्ता यांना रोजगाराच्या पहिल्या ४ वर्षांमध्ये त्यांच्या ईपीएफओ योगदानानुसार विशिष्ट प्रमाणात प्रोत्साहन रक्कम थेट उपलब्ध करून दिली जाईल. प्रथमच नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवा त्याच्या नियुक्तीनंतर १२ महिन्यांच्या आत संपुष्टात आल्यास, नियोक्त्याकडून अनुदान परत केले जाईल.

### ३. नियोक्त्यांना सहाय्य

नियोक्ता–केंद्रीत या योजनेत सर्व क्षेत्रतील अतिरिक्त रोजगार समाविष्ट केले जातील. यात मासिक १ लाख रुपये वेतनाच्या आतील सर्व अतिरिक्त रोजगारांची गणना केली जाईल. सरकार प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यासाठी नियोक्त्यांना त्यांच्या ईपीएफओ योगदानासाठी २ वर्षासाठी दरमहा ३,००० रुपये देईल. या योजनेमुळे ५० लाख लोकांना अतिरिक्त रोजगार प्रोत्साहन मिळण्याची आशा आहे. ■

# नोकरदार महिलांसाठी वसतीगृहे, पाळणाघरे




महिला आणि मुलींच्या विकासापासून ते महिलांच्या नेतृत्वाखाली जलद गतीने पुढे मार्गक्रमण करण्याच्या परिकल्पनेबाबत केंद्र सरकारचे धोरण स्पष्ट आहे. निम्म्या लोकसंख्येला त्यांचे हक्क आणि सन्मान देण्यात या सरकारने मोठी भूमिका बजावली आहे. नारी वंदन अधिनियम ते समाजात महिलांचे अधिकार वाढवण्यासाठी मालकी हक्कापर्यंत तसेच अन्य सुविधा पुरवण्यात सरकार निर्धाराने पुढे वाटचाल करत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात देखील महिला-प्रणित विकासाला चालना देण्यासाठी ३ लाख कोटींहून अधिक रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



**कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांचा वाढणार सहभाग**

स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी महिलांना रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करण्याची गरज आहे. सरकार त्यासाठी प्रत्येक स्तरावर सुविधा पुरवत आहे. याच अनुषंगाने अर्थसंकल्पात उद्योगाच्या मदतीने नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे आणि पाळणाघरे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय महिलांसाठी विशिष्ट कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचा आणि महिला स्वयं-सहायता गट उद्योजकांना बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. सरकारद्वारे घेण्यात आलेल्या या निर्णयांमुळे महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढेल.



## महिलांना सन्मान

● महिला आणि बालिकांसाठी असलेल्या योजनांसाठी ३ लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद केली आहे.

● औद्योगिक संस्थांच्या मदतीने नोकरदार महिलांसाठी वसतिगृहांची निर्मिती.

● महिला केंद्रीत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे करणार आयोजन.

● मुद्रा योजनेअंतर्गत उद्योजिकांना ३० कोटी रूपयांपेक्षा जास्त कर्जाचे केले वितरण.

● 'स्टेम' अभ्यासक्रमांसाठी होणाऱ्या नावनोंदणीमध्ये महिला आणि मुलींचा ४३ टक्के सहभाग. जगभरामध्ये ही संख्या सर्वाधिक.

● लोकसभा आणि राज्यसभेमध्ये १ महिलांसाठी एक तृतियांश राखीव जागा ठेवण्याचा निर्णय.

● कार्यालयांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्याचा निर्णय.

● कार्यस्थानी महिला कामगारांच्या बाळांसाठी पाळणाघराची स्थापना

● महिला स्वयं मदत गटाच्या उत्पादनांची बाजारपेठेपर्यंत पोहोच वाढविणे.

● उच्च शिक्षणामध्ये महिलांच्या नाव नोंदणीच्या प्रमाणात २८ टक्क्यांपर्यंत वृद्धी झाली आहे.

● ग्रामीण भागात प्रधानमंत्री घरकूल योजनेअंतर्गत बनविण्यात आलेल्या ७० टक्के घरांवर महिलांचा मालकी हक्क किंवा संयुक्त मालकी हक्काची दस्तावेज नोंदणी.

### महिला प्रणित विकास


महिला-प्रणित विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने यंदाच्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने महिला आणि मुलींसाठी लाभदायक योजनांसाठी ३ लाख कोटींहून अधिक रकमेची तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या निर्णयांमधून महिलांच्या आर्थिक विकासासाठी सरकारकडून केले जात असलेले प्रयत्न आणि वचनबद्धता दिसून येते.





### मुद्रांक शुल्क

समाजात महिलांचे हक्क आणि मान-सन्मान वाढवण्यासाठी केंद्र सरकार महिलांना मालकी हक्क प्रदान करणाऱ्या योजनांना प्रोत्साहन देत आहे. महिलांनी खरेदी केलेल्या मालमत्तेचे शुल्क आणखी कमी करण्याबाबत राज्यांना प्रोत्साहन दिले जाईल. ज्या राज्यांमध्ये जास्त मुद्रांक शुल्क आकारले जात आहे त्यांनाही मुद्रांक शुल्क कमी आकारण्याचे आवाहन केंद्र सरकार करेल. ही सुधारणा शहरी विकास योजनांचा अनिवार्य घटक बनवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. ■



# गोरगरीब, वंचितांचे कल्याण

**वंचितांच्या जीवनात होईल भविष्यात मोठे परिवर्तन मागील १० वर्षातील कार्यातून दिसते साक्ष!**

समाजातील वंचित, शोषित आणि पीडित लोकांच्या उत्थानासाठी भारत सरकारने गेल्या १० वर्षांमध्ये जे प्रयत्न केले आहेत, त्या विकास योजनांची समीक्षा केली तर अनेक गोष्टींची स्पष्टता होते. विद्यमान केंद्र सरकार अल्पकाळासाठी किंवा तात्पुरती उपाय योजना करण्याऐवजी दीर्घकाळाचा विचार करून, समाजातील या वंचित घटकाच्या सक्षमीकरणाबरोबरच शाश्वत, प्रभावी दृष्टिकोण ठेवून वाटचाल करीत आहे. देशभरामध्ये सर्वसमावेशक आणि मानवी विकासाबरोबरच २०४७ पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनविण्यासाठी देशातील गरीबांना सक्षम करण्यासाठी चांगल्या पद्धतीने तयार करण्यात आलेल्या नीती आणि योजनांची परिवर्तनकारी शक्ती ओळखून, त्या दिशेने पुढे जाणे आवश्यक आहे. याआधी केलेल्या कामाला आधार बनवून केंद्र सरकारने सामाजिक आणि आर्थिक त्याचबरोबर डिजिटल दरी सांधण्यासाठी आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी, आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक घटकाला सक्षम बनविणाऱ्या केल्या अनेक घोषणा....

● **गावे** आणि शहरातील गरीब वर्गासाठी घरकूले बांधण्याचे काम असो अथवा त्यांना दारिद्रय रेषेच्या बाहेर काढून मध्यम वर्गामध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम करण्याचे काम असो. या प्रत्येक स्तरावर केंद्र सरकारने नवीन योजना तयार केल्या आहेत. सरकारच्या या प्रयत्नांमुळे २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढण्यासाठी मदत झाली आहे.

● शिल्पकार, कारागीर, स्वयंसहायता समूह, अनुसूचित जाती-जमाती, उद्योजिका आणि पदपथावरील विक्रेते, फेरीवाले यांना त्यांच्या लहान व्यवसायासाठी आर्थिक हातभार लावण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री विश्वकर्मा, प्रधानमंत्री स्वनिधी, राष्ट्रीय आजीविका मिशन आणि स्टँड-अप इंडिया यांच्यासारख्या योजनांची अंमलबजावणी वेगाने केली जाणार आहे.

### प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना राहणार सुरु, कोणत्याही स्वस्त धान्य दुकानातून घेता घेईल धान्य !

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचा अवधी पाच वर्षांनी वाढविण्यात आली आहे. गरीबांपर्यंत अन्नधान्य पोहोचत आहे. तसेच अन्नधान्याची उपलब्धताही आहे, हे लक्षात घेवून केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमानुसार पात्र कुटुंबांसाठी प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेला १ जानेवारी, २०२४ पासून आगामी पाच वर्षांसाठी मुदतवाढ दिली आहे. यामध्ये ८१.३५ कोटी लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य यापुढेही मिळत राहणार आहे. ही योजना कोविड-१९ च्या आधीपासून सुरू आहे. सरकारने या योजनेवर कोविडपूर्व काळापासून ३.९१ लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधी खर्च केला आहे. या योजनेमध्ये 'वन नेशन-वन रेशनकार्ड' अंतर्गत 'पोर्टेबिलिटी' सुविधा असल्यामुळे देशभरातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानातून लाभार्थी अन्नधान्य घेवू शकतात.

### श्रम सुधारणा आणि सुविधा पोर्टलवर 'वन स्टॉए' - 'श्रम सेवा समाधान'

● 'वन स्टॉप' श्रम सेवा समाधान उपलब्ध व्हावे, यासाठी ई श्रम पोर्टल इतर विविध पोर्टलबरोबर एकीकृत करण्यात आले आहे. त्यामुळे आता नोकरी मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांना संभाव्य नियुक्तीदारांची माहिती त्याचबरोबर कौशल्य प्रदान करणाऱ्या संस्थांची माहितीही या पोर्टलद्वारे मिळू शकेल.

● उद्योग आणि व्यापारी यांच्यासाठी कायदे-नियम सुगम बनवण्याच्या उद्देशाने श्रम सुविधा आणि समाधान पोर्टलचे नूतनीकरण केले जाणार आहे.

● औद्योगिक कामगारांसाठी 'व्हीजीएफ' मदत आणि 'अँकर' उद्योगांच्या वचनबद्धतेसह 'पीपीपी' माध्यमातून संयुक्त निवासस्थानासाठी घरकुलांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार.

### गरजूसांठी ३ कोटी घरकुलांची निर्मित्ती

देशाच्या ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत अतिरिक्त ३कोटी घरकुलांची बांधणी करण्यात येणार आहे. आत्तापर्यंत पीएम घरकुल योजनेतून शहरामध्ये १.१८ कोटी घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये ८५ लाखांपेक्षा जास्त घरांचे काम पूर्ण झाले आहे. याचप्रमाणे पीएम घरकूल योजनेतून ग्रामीण भागामध्ये २.९४ कोटी घरकुलांची उभारणी पूर्ण झाली आहे.

### पीएम विश्वकर्मा योजनेच्या अंदाजपत्रकामध्ये जवळपास पाचपट वृद्धी

४८२४ कोटी रुपयांची तरतूद पीएम विश्वकर्मा योजनेसाठी करण्यात आली आहे. २०२३-२४च्या अर्थसंकल्पामध्ये या योजनेसाठी ९९० कोटींची तरतूद करण्यात आली होती. या योजनेचा १७ सप्टेंबर २०२३ रोजी प्रारंभ झाला. या योजनेचा उद्देश ज्या हस्तकला कारागिरांना हाताने तसेच विविध साधने वापरुन काम करावे लागते, त्या कारागिरांना लागणारी अवजारे, साधने घेता यावीत तसेच इतर सर्व आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे हा आहे.

● ५,०३,१६१ उमेदवारांना देशभरामध्ये पायाभूत प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्रे दिली.

● पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन pmvishwakarma.gov.in या संकेतस्थळाद्वारे मिळू शकेल.

● योजनेच्या माहितीसाठी कारागीर आणि शिल्पकार १८००२६७७७७७ या क्रमांकावर फोन करू शकतात. अथवा pm-vishwakarma@dcmsme.gov.in यावर मेल करता येईल. ■

# शेतीला सौर ऊर्जा

**देशातील** ऊर्जेच्या एकूण वापरापैकी कृषी क्षेत्रासाठी सुमारे २२ टक्के वापर होतो. महाराष्ट्रात सुमारे ४५ लाख कृषी वीज ग्राहक असून ते वीजेचा वापर हा मुख्यत: कृषी पंपासाठी करतात. शेतकऱ्यांना पूर्वी चक्रीय पद्धतीने दिवसा आणि रात्री वीजपुरवठा केला जात होता. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात सिंचन करताना अनेक अडचणींना सामना करावा लागत असे. यावर उपाय म्हणून शासनाने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' १४ जून २०१७ साली सुरू केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी या योजनेत आवश्कतेनुरूप बदलही करण्यात आले. तथापि, या योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव व आव्हाने पाहता या योजनेची अंमलबजावणी मिशन मोडवर करण्याची आवश्यकता निर्माण झाली. 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी'चे सुधारित स्वरूप निश्चित करण्यासाठी महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनी, महाऊर्जा तसेच पीडब्ल्यूसी संस्था यांच्या प्रतिनिधींचा एक अभ्यासगट प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आला. या अभ्यासगटाने विविध शिफारसी आणि मिशन २०२५ संदर्भात प्रयास संस्थेचा अहवाल विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना दिवसा वीज पुरवठा करण्यसाठी तसेच कृषी फिडर्सचे सौर ऊर्जीकरण मिशन मोडमध्ये करण्याच्या दृष्टीने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना– २.०' हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला.

या अभियानामध्ये 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' अधिक सक्षम आणि सुव्यवस्थित करणे, सन २०२५ पर्यंत कृषी वीज वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक कार्यपद्धती आणि देखरेखीचा आराखडा तयार करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा करणे आणि किमान ७ हजार मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करणे, ही उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. या अभियानांतर्गत विकेंद्रित प्रकल्प आस्थापित करण्यासाठी वीज उपकेंद्रांच्या परिघातील जमिनीची उपलब्धता, ग्रीड कनेक्टिव्हिटी आणि प्रकल्पाचे आकारमान हे महत्त्वाचे घटक आहेत. हे घटक परिस्थितीनुरूप बदलत असतात. यासाठी काही तरतुदींचा अवलंब करण्यात आला. जसे ०.५ ते १० 



मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ११ केव्ही/२२ केव्ही स्तरावर जोडणे, ५ ते २५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ३३ केव्ही स्तरावर जोडणे, ग्रीड कनेक्टीव्हिटी उपलब्ध असल्यास उजनी, जायकवाडी व इतर जलाशयांवर व्यवहार्यतेच्या अधीन राहून १० ते ५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प ११ केव्ही / २२ केव्ही / ३३ केव्ही स्तरावर जोडणे, प्रकल्प समूह तयार करणे अशा विविध तरतुदींचा अवलंब करण्यात आला.

या अभियानासाठी पडीक जमिनीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी वीज उपकेंद्रापासून जवळच्या परिघातील खाजगी जागा निश्चित करून सौर ऊर्जा प्रकल्पास उभारण्यास द्यावी, असे ठरविण्यात आले. यासाठी प्रकल्पासाठी शासकीय जमिनी नाममात्र रूपये एक या दराने ३० वर्षाच्या कालावधीकरिता भाडेपट्याने आणि पोटभाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत खाजगी जमीन भाडेपट्ट्यावर घेताना त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किमतीच्या ६ टक्के दरानुसार परिगणीत केलेला दर किंवा प्रतिवर्ष १ लाख २५ हजार रूपये प्रती हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दर म्हणून गृहीत धरण्यात आला. अशा प्रकारे प्रथम वर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दरावर प्रत्येक वर्षी ३ टक्के सरळ पद्धतीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ■

# बेरोजगार तरुणांसाठी सुवर्णसंधी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

**या** योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना ८ हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे. या उपक्रमांर्तगत बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवारांनी व रोजगार देणाऱ्या विविध आस्थापनांनी, उद्योजकांनीही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.



## योजनेचे निकष व पात्रता

योजनेकरिता उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे. किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर असावी. पुढील उच्च शिक्षण घेत असलेले उमेदवार या योजनेत पात्र असणार नाहीत. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा. योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दरमहा दिले जाईल. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना, उद्योग ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. या ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या थेट बँक (डीबीटी) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल. विद्यावेतनामध्ये सबंधित उद्योजकामार्फत जाहीर केलेली सुट्टी व अनुज्ञेय रजा याचा अंतर्भाव राहील. उद्योजक उमेदवारांना या विद्यावेतनाव्यतिरिक्त अधिकचे विद्यावेतन देऊ इच्छित असेल तर वाढीव रक्कम उमेदवारांना अतिरिक्त स्वरुपात देऊ शकेल. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही. प्रशिक्षणार्थीने वरील अटींची पूर्तता केली असली परंतु, संबंधित प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही. या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षणार्थीस कायम, नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NPS /MPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत. एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल. राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP-२०२०) अंतर्गत नवीन अभ्यासक्रम आराखड्यांतर्गत एकूण ६ व्हर्टीकल्स पैकी ५ व्या आणि ६ व्या व्हर्टिकल्समध्ये कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग आणि प्रेंटिसशीप या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आला आहे. युवकांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, सॉफ्टस्किल ट्रेनिंग, लाईफस्किल ट्रेनिंग, तांत्रिक प्रशिक्षण देऊन तरुणांची रोजगारक्षमता वाढविणे तसेच शिक्षण घेतांना कामाच्या ठिकाणी कामाशी संबंधित कार्यकौशल्य आत्मसात करणे, या उद्देशाने ज्या अभ्यासक्रमात कमीत कमी ६ महिन्यांचा ऑन जॉब ट्रेनिंग किंवा प्रेंटिसशिपचा समावेश आहे. अशा अभ्यासक्रमांतील विद्यार्थीदेखील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी पात्र ठरतील. ■

# मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय

**मराठवाडा** विभागात मोठ्या प्रमाणावर खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये आणण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार असून लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या जमिनी मूळ मालकाला मिळणार आहेत. यासंबंधीचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यामुळे ६० वर्षांपासून प्रलंबित प्रश्न निकाली निघणार आहे. मुख्यमंत्री असताना श्री. फडणवीस यांनी अशाच प्रकारचा निर्णय विदर्भासाठी घेतला होता आणि लाखो शेतकऱ्यांना कसत असलेल्या जमिनींचा मालकी हक्क मिळाला होता. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमधील या जमिनींबाबत विविध समस्या निर्माण झाल्या होत्या. याचा विचार करून या खालसा झालेल्या इनाम जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय आज उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला होता.

मराठवाड्यात साधारणतः १३,८०३ हेक्टर इतक्या मदतमाश जमिनी आहेत. मराठवाडयातील मदतमाश इनाम जमीनीचे हस्तांतरण करण्यासाठी व परवानगीशिवाय झालेली हस्तांतरणे नियमित करुन सदर जमीनींचा दर्जा वर्ग-१ करण्यासाठी सन २०१५ मध्ये नजराण्याची ५० टक्के रक्कम शासनाने निश्चित केली होती. तथापि, ही रक्कम जास्त असल्याने हस्तांतरणे नियमित करण्यासाठी कमी प्रमाणात प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे नजराणा रक्कम कमी करण्याची मराठवाडयातील अनेक लोकप्रतिनिंधीची मागणी होती. आज झालेल्या बैठकीमध्ये मदतमाश जमिनीच्या हस्तांतरणासाठी नजुल जमिनींचे हस्तांतरण नियमित करण्याबाबत शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच मदतमाश जमिनीच्या हस्तांतरणाकरिता बाजारमूल्य ५ टक्के दराने नजराणा आकारण्यात यावा, याकरिता सदर प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.



त्याचप्रमाणे मराठवाड्यात साधारणतः ४२,७१० हेक्टर इतकी खिदमतमाश जमीन आहे. या खिदमतमाश जमिनींवर देखील मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. तसेच बेकायदेशीर बांधकामे देखील झालेली आहेत. त्यामुळे अशा जमिनीच्या हस्तांतरणाची तरतूद उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली होती. यास्तव मराठवाड्यातील खिदमतमाश इनाम जमिनीचे हस्तांतरणासाठी १०० टक्के दराने नजराणा आकारण्यात येऊन हस्तांतरण नियमित करण्यात यावे, याकरिता यथायोग्य प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. या १०० टक्के नजराणा रकमेवरील ४०% रक्कम देवस्थानच्या कायमस्वरुपी देखभालीकरिता देण्यात येणार असून २० टक्के रक्कम देवस्थानच्या अर्चकासाठी देण्यात येणार आहे तर उर्वरित ४० टक्के रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल. उपरोक्त दोन्ही निर्णयांमुळे मराठवाड्यातील सामान्य नागरिकांचा सुमारे ६० वर्षापासूनचा प्रलंबित असलेला जमीनींसंदर्भातील प्रश्न संपुष्टात येणार आहे.

सदर निर्णयामुळे मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये जवळपास ५५ हजार हेक्टर जमिनी खुल्या होणार आहेत. या बैठकीस खासदार अशोक चव्हाण, सुरेश धस, राणा जगजितसिंह पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते. ■

# सोयाबीन, कापूस उत्पादकांना अर्थसाह्य

**गेल्या** वर्षी सोयाबीन, कापूस उत्पादकांना दर घसरणीमुळे नुकसान सोसावे लागले. या शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

### शेतकऱ्यांना किती अर्थसाहाय्य मिळणार?

गेल्या वर्षी आंतरराष्ट्रीय घडामोडी व अन्य कारणांमुळे झालेल्या किमतीतील घसरणीमुळे शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागले. त्यांना दिलासा देण्यासाठी खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टरी पाच हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली होती. त्यानुसार या शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार रुपये तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रतिहेक्टर ५ हजार रुपये (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

### सरकारची किती निधीची तरतूद आहे?

कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १५४८.३४ कोटी व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६.३४ कोटी अशा एकूण ४१९४.६८ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. हा खर्च कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी वाढ विशेष कृती योजनेअंतर्गत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ही योजना फक्त सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठीच मर्यादित आहे. ई-पीक पाहणी ॲप / पोर्टलवर नोंद असलेल्या क्षेत्रानुसार व त्या प्रमाणातच परिगणना करून अर्थसाहाय्य मिळणार आहे.

### शेतकऱ्यांसाठी पात्रतेचे निकष कोणते?

राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक



पाहणी ॲप / पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे, असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसाहाय्याकरिता पात्र राहतील. नोंदणी न करणारे शेतकरी या लाभापासून वंचित राहणार आहेत. पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना ऑनलाइन प्रणाली व सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यांमध्ये केवळ थेट लाभ हस्तांतरणाच्या (डीबीटी) माध्यमातूनच अर्थसाहाय्य जमा करण्यात येणार आहे.

### सोयाबीनचे उत्पादन आणि दर किती?

केंद्र सरकारकडून २०२३-२४ या वर्षात सोयाबीनला ४ हजार ६०० रुपये प्रतिक्विंटल एवढा हमीभाव जाहीर करण्यात आला होता. सोयाबीनचा उत्पादन खर्च वाढला आहे. मात्र संपूर्ण हंगामात हमीभावापेक्षा कमी दर मिळाला. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यात २०२३-२४ च्या खरीप हंगामात ५० लाख ८५ हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड करण्यात आली होती. त्यातून ६६ लाख ७ हजार मेट्रिक टन उत्पादन झाले. उत्पादकता ही १२९९ किलोग्रॅम प्रतिहेक्टर इतकी आहे. २०२२-२३ च्या हंगामात ६६ लाख ८० हजार मेट्रिक टन उत्पादन झाले होते. उत्पादकता ही १३६५ किलोग्रॅम प्रतिहेक्टर होती. उत्पादन आणि उत्पादकता कमी होऊनही सोयाबीनचे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांचा तोटा झाला. ■

# इथेनॉल मिश्रणात वाढ



**इथेनॉल** मिश्रित पेट्रोल कार्यक्रमांतर्गत पेट्रोलसोबत इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण इथेनॉल पुरवठा वर्ष (ईएसवाय) २०१३-१४ मधील ३८ कोटी लिटरवरून २०२०-२१ मध्ये ३०२.३ कोटी लिटरवर पोहोचले आहे. मिश्रणाच्या टक्केवारीत १.५३% वरून ८.१७% अशी वाढ झाली आहे. या कालावधीत पेट्रोलचा वापरही जवळपास ६४% वाढला. इंधन दर्जाच्या इथेनॉलचे उत्पादन आणि तेल विपणन कंपन्यांना त्याचा पुरवठा यात इथेनॉल पुरवठा वर्ष २०१३-१४ ते इथेनॉल पुरवठा वर्ष २०२०-२१ या काळात ७ पट वाढ झाली. या यशामुळे प्रोत्साहित होऊन सरकारने २०% इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य २०३० ऐवजी इथेनॉल पुरवठा वर्ष २०२५-२६ पर्यंत असे आधीच गाठण्याचा निर्धार केला आहे. तेल विपणन कंपन्यांनी पेट्रोलमध्ये १०% इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य निर्धारित लक्ष्याच्या पाच महिनेपूर्वीच म्हणजे जून २०२२ मध्येच साध्य केले आहे. पेट्रोलसह इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण आणखी वाढून इथेनॉल पुरवठा वर्ष २०२२-२३ मध्ये ५०० कोटी लिटरहून अधिक झाले आहे. टक्केवारीतली वाढ १२.०६% झाली आहे. चालू इथेनॉल पुरवठा वर्ष २०२३-२४ मध्ये मिश्रणाच्या टक्केवारीने १३% प्रमाण ओलांडले आहे. इथेनॉल पुरवठा वर्ष २०२५-२६ पर्यंत २०% इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी, सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. यात इथेनॉल मिश्रणाविषयीचा विस्तृत आराखडा, इथेनॉल निर्मितीसाठी फीडस्टॉकचा विस्तार; इथेनॉलचे पेट्रोलसोबत मिश्रण कार्यक्रमांतर्गत इथेनॉलच्या खरेदीसाठी लाभदायी मूल्य; इथेनॉलचे पेट्रोलसोबत मिश्रण कार्यक्रमांतर्गत इथेनॉलवरील वस्तू आणि सेवा कराचा दर ५% पर्यंत कमी, मिश्रणासाठी राज्यभरात इथेनॉलच्या मुक्त वाहतुकीसाठी उद्योग (विकास आणि नियमन) कायद्यात सुधारणा, देशात इथेनॉल उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी व्याज अनुदान योजना, इथेनॉल खरेदीसाठी सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांकडून नियमितपणे स्वारस्य अभिव्यक्ती जारी करणे, यांचा समावेश आहे. ■

# नवे फौजदारी कायदे- पोलिसांची जबाबदारी वाढली

**भारतीय** नागरीक सुरक्षा संहिता (बीएनएसएस),२०२३च्या तरतुदींमुळे पारदर्शकतेत आणि पोलिसांच्या दायित्वामध्ये वाढ झाली आहे अशा तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत-

(१) कलम ३७(ल) नुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी आणि प्रत्येक पोलिस स्थानकात एका पोलिस अधिकाऱ्याची नेमणूक बंधनकारक आहे. हा अधिकारी किमान सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावरील असेल आणि अटक केलेल्या व्यक्ती आदी बाबींची माहितीची नोंद ठेवणे आणि ती माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी या अधिकाऱ्यावर असेल.

(२) कलम ८२(२) नुसार जिल्ह्याबाहेर काढण्यात आलेल्या वॉरंटअंतर्गत अटकेप्रकरणी, अशा अटकेची आणि अटकेत असलेल्या व्यक्तीला ठेवलेल्या ठिकाणाबाबत माहिती, अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने, नियुक्त पोलीस अधिकाऱ्याला आणि अन्य जिल्ह्यातील, जिथे अटक झालेली व्यक्ती सामान्यतः निवासी आहे, अशा संबंधित पोलीस अधिकाऱ्याला द्यायला हवी, अशी तरतूद आहे.

(३) कलम १०५ नुसार झडती आणि जप्तीच्या कारवायांचे दृक्-श्राव्य रेकॉर्डिंग करून पोलीस अधिकाऱ्याने ते जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी न्यायालयीन दंडाधिकारी यांना विनाविलंब पाठवणे बंधनकारक आहे. कलम १८५ अंतर्गत झडतीचे रेकॉर्डिंग दृक्-श्राव्य इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करून त्याच्या प्रती गुन्ह्याची दखल घेण्याचे अधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे ४८ तासांच्या आत पाठवणे बंधनकारक आहे.

(४) कलम १७६(२) नुसार पोलिस अधिकाऱ्याने रोजचा दैनंदिनी अहवाल दर पंधरवड्याला दंडाधिकाऱ्याकडे पाठवणे बंधनकारक आहे.

(५) कलम १७६(३) नुसार सात वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षेस पात्र गुन्ह्यांच्या प्रकरणी गुन्हा घडलेल्या ठिकाणाचे दृक माध्यमातील रेकॉर्डिंग करणे बंधनकारक आहे.

(६) कलम १९३ ने इलेक्ट्रॉनिक उपकरणासंदर्भातील प्रकरणी ताब्याच्या क्रमवारीचा पोलिसांच्या अहवालात समावेश बंधनकारक आहे. या कलमानुसार तपासाची प्रगती माहिती देणारा अथवा पिडीताला पोलीस अधिकाऱ्याने ९० दिवसांच्या आत कळवणे बंधनकारक आहे. ■

# नाशिक फाटा-खेड महामार्गासाठी ८ हजार कोटी

## केंद्राकडून महत्त्वाकांक्षी ८ प्रकल्पांना मंजुरी



**केंद्रीय** मंत्रिमंडळाने देशभरातील आठ अतिजलद महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली. एकूण ९३६ किलोमीटर लांबीच्या या महामार्गांसाठी ५० हजार ६५५ कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळे देशभरात दळणवळणाची कार्यक्षमता आणि संपर्क अधिक सुलभ होईल असे सरकारतर्फे नमूद करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाबद्दल 'एक्स'वर माहिती देताना यामुळे देशातील रोजगाराच्या संधी वाढतील असा विश्वास व्यक्त केला. या प्रकल्पांअंतर्गत पुण्याजवळ ३० किलोमीटर लांबीचा उन्नत नाशिक फाटा–खेड महामार्ग बांधा–वापरा–हस्तांतरित करा (बीओटी) तत्त्वावर विकसित केला जाईल. यासाठी एकूण सात हजार ८२७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यामुळे पुणे आणि नाशिकदरम्यान राष्ट्रीय महामार्ग ६०वरील चाकण, भोसरी इत्यादी भागांना जोडणाऱ्या वाहतुकीचा वेग वाढेल. तसेच, पिंपरी–चिंचवडच्या आजूबाजूला वाहतुकीची गर्दी कमी होण्यासही मदत होईल.

या प्रकल्पामुळे ४.४२ कोटी मानवी दिवसांची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होईल असा दावाही करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीने मंजुरी दिलेल्या प्रकल्पांमध्ये सहा पदरी आग्रा–ग्वाल्हेर राष्ट्रीय अतिजलद महामार्ग (४,६१३ कोटी), चार पदरी खरगपूर–मोरेग्राम राष्ट्रीय अतिजलद महामार्ग (१०,२४७ कोटी), सहा पदरी

**केंद्रीय मंत्रिमंडळाने ५० हजार कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या आठ अतिजलद महामार्ग प्रकल्पांना मान्यता दिली. त्याचा आपल्या आर्थिक वाढीवर परिणाम होईल आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळेल.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

थराद–दीसा–मेहसाणा–अहमदाबाद राष्ट्रीय अतिजलद महामार्ग (१०,५३४ कोटी), चार पदरी अयोध्या रिंग रोड (३,९३५ कोटी), चार पदरी रायपूर–रांची राष्ट्रीय अतिजलद महामार्गाचा पथलगाव आणि गुमलादरम्यानचा भाग (४,४७३ कोटी) आणि सहा पदरी कानपूर रिंग रोड (३,२९८ कोटी) यांचा समावेश आहे. थराद–दीसा–मेहसाणा–अहमदाबाद राष्ट्रीय अतिजलद महामार्ग दिल्ली–मुंबई द्रुतगती मार्ग आणि अमृतसर–जामनगर महामार्गाला जोडेल. यामुळे महाराष्ट्रातील जेएनपीटी, मुंबई आणि वाधवान (प्रस्तावित) ही मुख्य बंदरे पंजाब, हरियाणा आणि राजस्थानातील औद्योगिक भागांना जोडली जातील. त्याशिवाय बांधा, वापरा, टोल (बीओटी) तत्त्वावर उत्तर गुवाहाटी बायपास आणि सध्याच्या गुवाहाटी बायपासचे विस्तारीकरणाचाही (५,७२९ कोटी) समावेश आहे. २०४७ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था ३० ट्रिलियन डॉलर इतकी होण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे असे सरकारतर्फे सांगण्यात आले. ■

# ठाण्यातील पाचही मतदारसंघात विजयाचा संकल्प




**भाजपा** ठाणे शहर जिल्हा अंतर्गत येणाऱ्या ठाणे शहर, कोपरी–पाचपाखाडी, ओवळा–माजिवडा, कळवा–मुंब्रा आणि कल्याण ग्रामीण मतदारसंघात भाजपाच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या विजयाचा संकल्प करण्यात आला. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच महायुतीच्या नेत्यांनी ठरविलेल्या उमेदवारांच्या विजयासाठी कार्य करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. त्याचबरोबर आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराचे रणशिंग फुंकण्यात आले.

प्रदेशच्या महाअधिवेशनानंतर ठाणे शहर जिल्ह्याच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक खारकर आळीतील महाजनवाडी येथील सभागृहात उत्साहात पार पडली. या बैठकीला प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, ठाणे लोकसभा विस्तारक जयप्रकाश ठाकुर, जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, ठाणे शहर विधानसभा प्रमुख सुभाष काळे, ओवळा–माजिवडा विधानसभा प्रमुख मनोहर डुंबरे, सरचिटणीस मनोहर सुगदरे, सचिन पाटील, विलास साठे, डॉ. समीरा भारती, माजी नगरसेवक संदीप लेले, महिला मोर्चाच्या अध्यक्षा स्नेहा पाटील, युवा मोर्चाचे अध्यक्ष सुरज दळवी आदींसह पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. या बैठकीला पालघरचे खासदार हेमंत सवरा यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात येणार होते. मात्र, अपरिहार्य कारणामुळे ते अनुपस्थित होते. जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी प्रस्तावना केली. या बैठकीत सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. त्यानंतर प्रदेश महाअधिवेशनात केंद्रीय गृह मंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार विधानसभा निवडणुकीपर्यंत कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तर आ. निरंजन डावखरे यांच्या सूचनेनुसार, कोकणात सहापैकी पाच जागांवर महायुतीचा झेंडा फडकविण्यात महत्वाचे योगदान असलेल्या सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचेही अभिनंदन करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

या बैठकीला प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे यांनी मार्गदर्शन केले. लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडून खोटे नरेटिव्ह प्रस्थापित करण्यात आले होते. त्याचा मुकाबला भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने करून मतदारांना भाजपाची भूमिका पटवून द्यावी. लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना प्रत्येक कुटुंबापर्यंत पोचवावी, असे आवाहन बैठकीत करण्यात आले. आगामी विधानसभा निवडणूक जिंकण्याबरोबरच त्यानंतर होणाऱ्या महापालिका निवडणुकीसाठी भाजपा कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे आवाहनही करण्यात आले. ■




**सावनेर (जि.नागपूर)– जिल्हा विस्तारित कार्यकारिणीची बैठक– उपस्थिती–** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ.टेकचंद सावरकर, आ. समीर मेघे ज्येष्ठ नेते डॉ. आशिष देशमुख, माजी आमदार सुधीर पारवे, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, ज्येष्ठ नेते डॉ. राजीव पोतदार आदी.




**वाशिम– जिल्हा विस्तारित कार्यकारिणीची बैठक– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, प्रदेश सरचिटणीस आ. लक्ष्मण मलिक, खा. अनुप धोत्रे, जिल्हाध्यक्ष श्याम बडे, माजी खासदार अनंतराव देशमुख, माजी आमदार विजय जाधव, माजी आमदार पुरुषोत्तम राजगुरू, प्रदेश सचिव अ. जा. मोर्चा शाम खोडे, प्रदेश सचिव महिला आघाडी शुभदा नायक, प्रदेश सचिव महिला आघाडी प्राजक्ता माहीकर, प्रदेश सचिव युवा मोर्चा सुरज चौधरी आदी.



**भंडारा– जिल्हा विस्तारित कार्यकारिणीची बैठक– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, विदर्भ संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, आ.डॉ.परिणय फुके, माजी खासदार सुनील मेंढे, जिल्हाध्यक्ष प्रकाश बाळबुद्धे, माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते, माजी आमदार बाळाभाऊ काशिवार, लोकसभा समन्वयक बाळाभाऊ अंजणकर, माजी नगराध्यक्ष प्रदीप पडोळे, विधानसभा प्रमुख अनुप ढोके, शहराध्यक्ष सचिन कुंभलकर आदी.




**वर्धा– जिल्हा अधिवेशन– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपाचे विभागीय संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, माजी खासदार रामदास तडस, आ. मदन येरावार, आ. दादा केचे, आ. समीर कुणावर, आ. पंकज भोयर, माजी आमदार रामदास आंबटकर, सुमीत वानखेडे, सुधीर दिवे आदी.




**नांदेड– जिल्हा अधिवेशन– उपस्थिती–** खा. अशोक चव्हाण, खा. डॉ.अजित गोपछडे, माजी खासदार प्रतापराव पाटील–चिखलीकर प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, प्रदेश सचिव देविदास राठोड, प्रवीण साले, नंदू कुलकर्णी, जनार्दन ठाकूर, चैतन्य बापू देशमुख, अरविंद भारतीया, मिलिंद देशमुख, किशोर स्वामी, डॉ. सचिन उमरेकर, दीपक सिंह रावत, विनायक सगर, श्रद्धा चव्हाण, डॉ. शितल भालके, अमोल कदम, विजय गंभीरे आदी.




**नंदुरबार– जिल्हा अधिवेशन– उपस्थिती–** केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, आदिवासी विकास मंत्री डॉ.विजय गावित, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माजी खासदार डॉ. हिना गावित, जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, नंदुरबार प्रभारी–प्रदेश सचिव अजय भोळे, जिल्हाध्यक्ष निलेश माळी, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र गावित, आ. राजेश पाडवी, प्रदेश सदस्य दीपक बापू पाटील, डॉ. शशिकांत वाणी आदी.




**नाशिक– जिल्हा विस्तारित कार्यकारिणीची बैठक– उपस्थिती–** ग्रामविकास आणि पंचायत राज, पर्यटन मंत्री गिरीश महाजन, महानगराध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश कार्यालय प्रभारी व उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे, माजी मंत्री डॉ.भारती पवार, आ.प्रा. देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, गिरीश पालवे, सुनील केदार, माजी आमदार बाळासाहेब सानप, सुनील बच्छाव, काशिनाथ शिलेदार, ॲड. शाम बडोदे, रोहिणी नायडू, हिमगौरी आडके, सोनाली ठाकरे, विजय साने, माजी महापौर सतीश कुलकर्णी, रंजना भानसी, मनीषा बोडके आदी.




**धुळे– जिल्हा अधिवेशन– उपस्थिती–** केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, माजी खासदार डॉ. सुभाष भामरे, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल, जेष्ठ नेते लखन भतवाल, मदनलाल मिश्रा, हिरामण आप्पा गवळी, संजय शर्मा, माजी महापौर प्रतिभा चौधरी, प्रदीप नाना करपे, जयश्री अहिरराव, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष देवेंद्र सोनार, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी आदी.



**सिंधुदुर्ग– जिल्हा विस्तारित कार्यकारिणी बैठक– उपस्थिती–** सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खा. नारायण राणे, माजी खासदार निलेश राणे, माजी आमदार राजन तेली, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत आदी.



**देव हृदय कीट हृदय विकारासाठी रामबाण उपाय ठरणाऱ्या किटचे अनावरण प्रदेश सरचिटणीस आ. श्रीकांती भारतीय व प्रदेश मुख्य सह प्रवक्ते अजित चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले– उपस्थिती–** प्रदेश सचिव भरत पाटील, प्रदेश संयोजक उद्योग आघाडी प्रमोद वाकोडकर, किट निर्माते प्रदेश कार्यकारीणी निमंत्रित सदस्य तथा मराठवाडा संयोजक बुद्धिजीवी प्रकोष्ठ गजानन जोशी, युवा नेते कुणाल चौधरी, प्रदेश समन्वयक वैद्यकीय आघाडी डॉ.स्वप्नील मंत्री आदी.



**लांजा तालुक्यातील खानवली गावात उबाठा गटातील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती–** जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, तालुकाध्यक्ष चंद्रकांत मांडवकर, जिल्हा उपाध्यक्ष मुन्ना शेठ खामकर, तालुका सरचिटणीस विराज हरमळे, शैलेश खामकर, युवा अध्यक्ष अजय गुरव, कोटगावचे उपसरपंच रवींद्र नारकर, भटके विमुक्त जिल्हा उपाध्यक्ष अनंत खरात, पाटकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**मुंबई– लाडकी बहीण योजनेचे मार्गदर्शन व फॉर्म वाटप– उपस्थिती–** माजी आमदार अतुल शाह, स्वाती दमानिया, संध्या राणा, सुंदरी चौरसिया, मुकेश गावकर, रमेश मेहता, शिवशंकर शुक्ला, वीरेंद्र मिस्त्री, अनील सुर्वे, बळवंत गायकवाड, शैलेश शिंदे, मनीष चौरसिया, पप्पु चौरसिया, जसु मोदी, रौनक कारेलिया, दोलाराम चौधरी, राजा पाटील, अनुराग चौरसिया, अश्विन कांबळे, विजय गायकवाड आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com